१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, मंगळवार ५ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-६१, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 61 Marathi - Daily - Mumbai, 5 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

'विजयाची झालमुरी'

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# मोदी विरोधातील शेवटचे दणकट बुरूजही कोसळले

# ममता पराभूत! स्टॅलिनचाही पराभव! विजय हिरो

## ममतांची १५ वर्षांची राजवट संपुष्टात भाजपाची बंगालमध्ये पहिल्यांदा सत्ता

■ कोलकाता

**आज** सकाळी ८ वाजता पाचही राज्यांत मतमोजणी सुरू झाली. बंगालमध्ये सुरुवातीपासूनच भाजपाने तृणमूल काँग्रेसवर आघाडी घेतली. तासाभरातील कलानंतरच दोन्ही पक्षांच्या जागांमधील फरक वाढत गेला आणि भाजपा बहुमताकडे जात असल्याचे दिसून आले. दुपारपर्यंत सगळ्या जागांचे कल हाती आले, तेव्हा भाजपा आणि तृणमूल यांच्यात १०० हून जागांचा फरक होता. पश्चिम बंगालमध्ये भाजपा सत्तेत येणार हे दिसताच भाजपा कार्यकर्त्यांमध्ये आनंदाची लहर पसरली. भाजपा कार्यकर्ते रस्त्यावर येऊन नाचू लागले आणि 'जय श्री राम' च्या घोषणा देऊ लागले. मिष्टी दोई आणि झालमुरी (भेळ)चे वाटप सुरू झाले. पंतप्रधान मोदी यांनी निवडणूक प्रचारासाठी पश्चिम बंगालचा दौरा केला होता, तेव्हा एका दुकानात झालमुरी खाल्ली होती. तीच वाटून भाजपा कार्यकर्ते आनंदोत्सव साजरा करत होते. तर तृणमूलच्या कार्यकर्त्यांत निराशा होती. आसनमोल आणि बैरतपूर येथे भाजपा आणि तृणमूल कार्यकर्ते आमनेसामने आले. तृणमूलच्या कार्यालयावर भाजपा कार्यकर्त्यांनी हल्ला केला आणि त्याला आग लावल्याचा आरोप तृणमूल कार्यकर्त्यांनी केला.

**प.बंगाल (२९३)**

| | |
|---|---|
| भाजपा | २०८ |
| तृणमूल | ७९ |
| इतर | ६ |

पान ८ वर

धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी, मूळव्याध इ. विकारांवर प्रभावी!
आजच रात्री घ्या, सकाळी OK!
डॉ. अभिजीत 9422011723



पाच राज्यांच्या निवडणुकांचा अपेक्षित निकाल आज लागला. पश्चिम बंगालमध्ये भाजपाने ममता बॅनर्जी यांची सत्ता उलथवत ऐतिहासिक कामागिरी नोंदवली. ममता यांनी १५ वर्षांपूर्वी डाव्यांना पराभूत करत त्यांची ३५ वर्षांची राजवट संपवत बंगालमधून हद्दपार केले होते. त्याच पद्धतीने आज भाजपाने पश्चिम बंगालमध्ये दोन तृतियांश जागा जिंकत तृणमूलचा दारूण पराभव केला. भवानीपूर मतदारसंघातून ममता स्वत:ही पराभूत झाल्या. तामिळनाडूत पहिल्यांदाच निवडणुकीच्या मैदानात उतरलेले सिनेअभिनेते विजय यांच्या टीव्हीके पक्षाने मुसंडी मारत द्रमुकच्या स्टॅलिन यांना पराभूत केले. आसाममध्ये भाजपाचे हिमंता बिस्वा सरमा यांनी काँग्रेसला चारी मुंड्या चीत करत सत्ता राखली. तर केरळात काँग्रेस आघाडीने डाव्या आघाडीवर मात करत त्यांची राजवट असलेल्या शेवटच्या राज्यातून सत्तेबाहेर फेकले. यानंतर भाजपाने मोठा जल्लोष केला.

या निवडणुकांनी मोदी यांच्या विरोधात खंबीर भूमिका घेणाऱ्या नेत्यांना मोठा धक्का दिला आहे. महाआघाडी करणारे नितिश कुमार यांना भाजपाने आपल्याकडे ओढले व लालूप्रसाद यांच्या साम्राज्याला सुरुंग लावला, महाराष्ट्रात शिवसेना फोडून ठाकरेंची ताकद कमी केली, ओरिसात नवीन पटनाईक यांना सत्तेवरून खेचले, दिल्लीत 'आप'ला फोडून केजरीवाल यांना जेरीस आणले. आता पुढील वर्षी पंजाब विधानसभा निवडणुकीत 'आप'ची सत्ता घालवण्याची तयारी सुरू आहे, कर्नाटकात कधीही काँग्रेस फुटेल अशी स्थिती आहे. भाजपाला फक्त दक्षिणेत प्रवेश पूर्ण मिळालेला नाही, पण आता तामिळनाडूत विजय यांना बरोबर घेण्याची चाल भाजपा खेळेल. या सगळ्यात काँग्रेस अत्यंत अपयशी ठरला आहे. प. बंगालमधील विजयासोबत भाजपा किंवा भाजपा आघाडीने आता देशातील २२ राज्यांमध्ये आपली सत्ता स्थापन केली. भाजपाची सत्ता नसलेली मोजकीच राज्य आता उरली आहेत.

## विजय यांची अनपेक्षित मुसंडी द्रमुकचा लाजिरवाणा पराभव

■ चेन्नई



**तामिळनाडूत** मोठी उलथापालथ होत मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या सत्ताधारी द्रमुक पक्षाला लाजिरवाण्या पराभवाला समोरे जावे लागले. स्वतः स्टॅलिन यांचा एका मतदारसंघात धक्कादायक पराभव झाला. तर अवघ्या दोन वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या तामिळ सुपरस्टार विजय थलापती यांच्या तमिलगा वेट्री कळगम (टीव्हीके) पक्षाने अनपेक्षितपणे घवघवीत यश मिळवले. १०५ जागा जिंकणारा टीव्हीके हा सर्वात मोठा पक्ष ठरला. मात्र, कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळालेले नाही. स्टॅलिन यांचा द्रमुक तिसऱ्या स्थानी फेकला गेला. राज्यात १९६७ नंतर पहिल्यांदाच पारंपरिक द्रविडी राजकारणाला फाटा देत द्रमुक आणि अण्णा द्रमुक या दोन पक्षांव्यतिरिक्त तिसरा पक्ष सत्तेवर येणार आहे.

तामिळनाडूत ८५ टक्क्यांहून अधिक मतदान झाले होते. त्याचे रुपांतर प्रस्थापितविरोधी लाटेत झाल्याचे दिसून आले. निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकताच टीव्हीकेने अण्णा द्रमुककडे जाण्याआधी काँग्रेसने टीव्हीकेसमोर पाठिंब्याचा प्रस्ताव ठेवला. निवडणुकीपूर्वी काँग्रेस इंडिया आघाडीत द्रमुकसोबत होता. मात्र टीव्हीकेची वाढलेली ताकद पाहून काँग्रेस टीव्हीकेला बाहेरून किंवा थेट पाठिंबा द्यायला तयार झाला आहे. त्यामुळे नवे

**तामिळनाडू (२३४)**

| | |
|---|---|
| द्रमुक | ७४ |
| अण्णा द्रमूक | ५३ |
| टीव्हीके | १०७ |

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

पान ८ वर

## ४,००० कोटींच्या पंढरपूर कॉरिडॉरला अखेर मंजुरी

■ मुंबई

**बहुचर्चित** पंढरपूर कॉरिडॉर आणि शहर विकास आराखड्याला आज येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या कॉरिडॉरला काही व्यापाऱ्यांनी विरोध केला होता.

या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, वनमंत्री गणेश नाईक, आमदार समाधान आवताडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी १ ऑगस्टपर्यंत भूसंपादन आणि इतर प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या असल्याची माहिती समाधान आवताडे यांनी दिली. पंढरपूर देवस्थान विकास आराखडा आणि कॉरिडॉरसाठी सुमारे ४,००० कोटी रुपयांचा प्रकल्प तयार करण्यात आला आहे. आता शिखर समितीने त्याला मंजुरी दिली आहे. पुढील ५० वर्षांतील भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन मंदिर परिसरात कॉरिडॉर उभारणे आणि शहराचा सर्वांगीण विकास करणे हा या आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. विठ्ठल दर्शनासाठी देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक पंढरपुरात येतात. आषाढी आणि कार्तिकी एकादशीसह इतर दिवशीही लाखोंच्या संख्येने भाविकांची गर्दी होते. गेल्या आषाढी एकादशीला सुमारे २८ लाख भाविकांनी पंढरीत हजेरी लावल्याची नोंद झाली होती. याच पार्श्वभूमीवर सुरक्षितता, सुकर दर्शन आणि सुविधा वाढवण्यासाठी हा विकास आराखडा तयार केला आहे.



## सुनेत्रा पवार यांनी विक्रम रचला बारामतीत २,१८,९३० मतांनी विजय

■ बारामती

**पाच** राज्यांच्या निवडणुकीबरोबर महाराष्ट्रात अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती आणि शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. बारामतीमध्ये दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी देशातील सर्वात मोठ्या विजयाचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांनी २,१८,९३० मतांच्या फरकाने विजय मिळवला. तर राहुरीत पोटनिवडणुकीत शिवाजी कर्डिले यांचे पुत्र आणि भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी १ लाख ११ हजार ८२६ मतांनी विजय मिळवला. त्यांना एकूण १,३९,२१२ मते मिळाली.



सर्वाधिक मताधिक्याने जिंकण्याचा विक्रम उत्तर प्रदेशातील साहिबाबाद मतदारसंघातील आमदार सुनील कुमार शर्मा यांच्या नावावर होता. त्यांनी २०२२ मध्ये २,१४,८३५ मतांच्या फरकाने विजय मिळवला होता. तो सुनेत्रा पवार यांनी मोडला. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी महायुतीने प्रयत्न केले होते. त्यानंतर

पान ७ वर

## राहुरीत भाजपाने गड राखला अक्षय कर्डिलेंचा दमदार विजय



नगर जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांना शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार गोविंद मोकाटे, वंचितचे संतोष चोळके आणि उबाठाचे बंडखोर उमेदवार रावसाहेब खेवरे यांनी आव्हान होते. मात्र कर्डिले यांनी विरोधकांचा सुपडा साफ केला. एकूण २७ फेऱ्यांमध्ये पार पडलेल्या या प्रक्रियेत पहिल्या फेरीपासूनच अक्षय कर्डिले यांनी आघाडी कायम ठेवली होती. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे या दमदार विजयानंतर अक्षय कर्डिले यांनी भावुक प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, आज माझे वडील असते तर खूप आनंद झाला असता. मला ज्यांनी ज्यांनी मदत केली मी त्यांना कधी विसरू शकत नाही.

## लिपुलेख खिंडीतून मानसरोवर यात्रा नेपाळचा आक्षेप! भारताला पत्र

**भारत आणि चीन यांच्याकडून आयोजित करण्यात आलेल्या आगामी कैलास मानसरोवर यात्रेला नेपाळ सरकारने आक्षेप घेतला. या यात्रेचा लिपुलेख खिंडीतून जाणाऱ्या मार्गाला नेपाळने विरोध केला आहे. लिपुलेखवर भारत आणि नेपाळ दोन्ही देश मालकी हक्क सांगत आहेत. त्यावरून नेपाळने ही भूमिका घेतली आहे.**



■ काठमांडू

**नेपाळच्या** परराष्ट्र मंत्रालयाने यासंदर्भात एक्सवर पोस्ट केली आहे. त्यामध्ये महाकाली नदीच्या पूर्वेकडे असलेले लिपुलेख, लिम्पियाधुरू आणि कालापानी हा नेपाळचा अविभाज्य घटक आहे, असे नेपाळ सरकारने म्हटले आहे. १८१६ सालच्या सुगौली करारानुसार हा भूभाग नेपाळच्या हद्दीत येतो. त्यामुळे या ठिकाणाहून यात्रेचे आयोजन करता येणार नाही, असे नेपाळ सरकारने भारत आणि चीन या दोन्ही देशांना स्वतंत्रपणे पत्र लिहून कळवले आहे.

काही दिवसांपूर्वी भारत सरकारने धारचुला ते लिपुलेख खिंड यांना जोडणाऱ्या ८० किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे उद्घाटन केले. हा रस्ता कैलास मानसरोवर यात्रेतील महत्त्वाचा टप्पा आहे. त्यावेळीदेखील नेपाळ सरकारने भारताला या क्षेत्रात कोणतेही बांधकाम केले जाऊ नये, असा इशारा दिला होता.

## ट्रान्सजेंडर कायद्याच्या वैधतेला आव्हान सुप्रीम कोर्टाची केंद्र-राज्यांना नोटीस

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने ट्रान्सजेंडर व्यक्ती सुधारणा अधिनियम, २०२६ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर केंद्र सरकार आणि सर्व राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांना नोटीस बजावली आहे. मुख्य न्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने सहा आठवड्यांच्या आत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर होणार आहे.

या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने वरिष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी जोरदार युक्तिवाद केला की, नवीन दुरुस्तीमुळे ट्रान्सजेंडर व्यक्तींचा 'स्व-ओळख' हा मूलभूत अधिकार हिरावला जात आहे. त्यांनी हेही नमूद केले की, ही दुरुस्ती २०१४ मधील ऐतिहासिक एनएएलएसए निकालाच्या विरोधात आहे. त्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक व्यक्तीला स्वतःची लैंगिक ओळख ठरवण्याचा अधिकार दिला होता. सुनावणीदरम्यान मुख्य न्यायाधीशांनी काही शंका उपस्थित केल्या. त्यांनी विचारले की, स्व-ओळखीचा अधिकार दिल्यास काही लोक त्याचा गैरवापर करून लाभ घेण्याचा प्रयत्न करू शकतात का? यावर सिंघवी यांनी उत्तर दिले की, अशा गैरवापराची शक्यता फारच कमी आहे आणि



पान ७ वर

## विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर शेअर बाजारामध्ये जोरदार तेजी

■ मुंबई

**पाच** राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल आणि जागतिक स्तरावरील मजबूत संकेतांमुळे आज भारतीय शेअर बाजारात तुफानी तेजी दिसून आली. तेजीच्या या लाटेत मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ३५५.९० अंकांच्या वाढीसह ७७,२६९.४० अंकांवर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १२१.७५ अंकांनी वाढून २४,११९.३० अंकांवर बंद झाला.

मुंबई शेअर बाजारात लार्ज कॅप कंपन्यांमध्ये आज सर्वाधिक तेजी दिसून आली. अदानी पोर्ट्सपासून रिलायन्सपर्यंत लार्ज कॅप कंपन्यांचे समभाग वाढीसह बंद झाले. अदानी पोर्ट्स (५.३०), एचयूएल (२.६६), रिलायन्स (२.२४), एल अँड टी (२.१८), आणि इटर्नल (२.०९) आदि कंपन्यांचे शेअर तेजीत राहिले.

आज बाजाराची सुरुवात वाढीसह झाली. सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही प्रमुख निर्देशांक वाढीसह घोडदौड करत होते. मात्र दुपारी १२.५० वाजता अचानक तेजीला लगाम लागला होता. सुरुवातीला ८०० अंक उसळलेला सेन्सेक्स ३७५ अंकांपर्यंत खाली आला होता. तर निफ्टी ११७ अंकांनी वधारला.

## नसरापूर प्रकरणी परळीत रास्ता रोको! महामार्ग ठप्प

■ बीड

**पुणे** जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात ४ वर्षीय बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ आज परळी वैजनाथ येथे छत्रपती संभाजी महाराज चौकात संतप्त नागरिकांनी 'रास्ता रोको' आंदोलन केले. यामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला.

या आंदोलनात महिलांचा मोठा सहभाग होता. संतप्त महिलांनी 'दोषींना तत्काळ फाशी द्या' अशी जोरदार मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. तसेच दोषींना कठोरात कठोर शिक्षा मिळाली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## विरार स्थानकात 'एसी' लोकलविरोधात ट्रॅकवर उतरून संतप्त प्रवाशांचे आंदोलन

■ विरार

**सकाळी** ८.२८ वाजताची विरार-चर्चगेट लोकल १ मेपासून वातानुकूलित (एसी) करण्यात आल्याच्या निषेधार्थ विरार स्थानकात प्रवाशांचा संताप अनावर झाला. हजारो प्रवाशांनी रेल्वे रुळावर उतरून गाडी रोखली. या आंदोलनामुळे पश्चिम रेल्वे मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली.

या आंदोलनामुळे अनेक गाड्या १० ते १५ मिनिटे उशिराने धावल्या. त्यामुळे संपूर्ण वेळापत्रक कोलमडले. पश्चिम रेल्वेने १ मेपासून ८.२८ ची लोकल वातानुकूलित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, आधीच ८.३३ वाजता एक लोकल वातानुकूलित असताना केवळ पाच मिनिटांच्या अंतराने आणखी एक वातानुकूलित



पान ७ वर

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

हाऊसकीपींग स्टाफ व महिला, पगार ग्रॉस- 15,473/-, वार्षिक बोनस, PF, ESIC लागू. संपर्क- CISB Services- **9867949433/ 8779462234.** {NC260395}

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वार्डबॉय पाहिजेत. पगार (30,000-90,000) **9820628009** {NC260340}

प्रतिष्ठित कंपनीला आऊटडोअर कामासाठी प्रत्येक झोनवाईज 60 फिल्ड एक्झिक्युटिव्ह पाहिजेत. अनुभवींना आणि बाईकर्सना प्राधान्य. पगार 30,000/-+5,000/- ट्रॅव्हलिंग अलाऊंस, बायोडाटा व्हॉट्सअप पाठवा आणि कॉल करा. प्रिंस कुरीअर **9820385767/ 9029013014** {NC260345}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशियन पाहिजेत. चांगला पगार + आकर्षक सुविधा. संपर्कः- **9820683431** {NC260407}

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग- दादर, गोवंडी, वरळी, मुंबई सेंट्रल ठाणे, अंबरनाथ- **8291056761 / 8422880515 / 7506129517** {NC254580}

कुरिअर कंपनीमध्ये पिकअप व डिलिव्हरीसाठी त्वरित मुले पाहिजेत. फोर्ट, दादर, लोअर परेल, वडाळा, नवी मुंबई, दररोज रोख 800/- + प्रवास खर्च - कॅशमध्ये मिळेल. Speedman Express 191-B, 9th Cavel Cross Lane, 1st Floor, Dr. Viegas Street, Near Barretto High School. Chirabazar, Mumbai-400002. Note - फोन न करता ऑफिसमध्ये येणे. {NC260011}

कांदिवली (वेस्ट) पेस्ट कंट्रोल कामासाठी अनुभवी/ बिनअनुभवी मुले पाहिजेत. **9029181030** {NC260356}

वैद्य ॲक्टीवा ट्रेनिंग स्कुल मध्ये कामासाठी मुली पाहिजेत चर्नीरोड (पूर्व), रु. 10,000/- MOB. वंदना- **9819331678 / 9004262658** {NC260414}

**ठाणे येथील सुप्रसिद्ध कोल्हापुरी हॉटेलसाठी अनुभवी किचन व सर्विस स्टाफ हवा. संपर्कः- 9869026771** {NC260417}

दादर येथे कंपनीसाठी फ्रेश B.com Lady Account Assistant पाहिजेत. Tally Word Excel आवश्यक. संपर्कः- **02224228330 / 9987328717** {NC260416}

## पाहिजेत

गोरेगाव येथे त्वरीत जागा भरणे आहे. स्टोअरकिपर आणि हाऊसकिपिंग सुपरवायझर, संपर्कः- **9987328717 / 02224228330** {NC260414}

20 X 28 Heidelberg मशीनसाठी प्रिंटर पाहिजे. 343 3rd Floor Pragati Ind. Lower Parel **9820125148** {NC260012}

अनुभवी (पार्ट टाईम अकाऊंटंट) तसेच वॉर्ड बॉय, नर्सेस पाहिजेत. भेटा- डॉ. खंडेपारकर नर्सिंग होम, सर भालचंद्र रोड, हिंदू कॉलनी, दादर पूर्व मुंबई-४०००१४. वेळ - सकाळी ११.०० -१२.३० आणि सायंकाळी ७.००- ८.३०. email-apply. knh@gmail.com {NC260409}

सिक्युरिटी गार्डची भरती ड्युटी 8 तास मुलुंड, वैशाली नगर/ वरळीनाका- **9004883251** {NC260410}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार- 12,000 + गाडीभाडे + कमिशन. **8356824867** {NC260412}

भायखळा / माझगांव विभागात कुरियर डिलिव्हरीसाठी कमिशन / पगारावर मुले पाहिजे. (Daily payment) **7208841538** {NC260413}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर, सर्व जाती थेट भेट कल्याण. **9869868620** {NC260009}

## गुंतवणूकविषयक

फक्त ६ महिन्यात घर, लग्न, कामाच्या (पैशाच्या) समस्या सोडविणारे जीवन विमा गुंतवणूक मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC260344}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260031}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3,000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9076403434 / 8652643434** {NC260411}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# एसबीएसपीचे प्रदेशाध्यक्ष कश्यप व्हीआयपीत

■ लखनौ

**उत्तर** प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुहेलदेव भारतीय समाज पक्षाला (एसबीएसपी) मोठा धक्का बसला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रेमचंद कश्यप आणि माजी राज्यमंत्री अच्छेलाल निषाद यांनी त्यांच्या शेकडो समर्थकांसह एसबीएसपी सोडून विकासशील इंसान पार्टीमध्ये (व्हीआयपी) प्रवेश केला. व्हीआयपीचे अध्यक्ष मुकेश साहनी यांनी या दोन्ही नेत्यांना आणि त्यांच्या समर्थकांना पक्षाचे सदस्यत्व दिले. एसबीएसपीचे अध्यक्ष आणि पंचायत राज मंत्री ओम प्रकाश राजभर यांनीही प्रेमचंद यांच्यावर पक्षविरोधी कारवायांमध्ये सामील असल्याचा आरोप करत त्यांना पक्षातून काढून टाकणारे पत्र जारी केले.

देश विदेश

# दक्षिण कोरियात झोपेची स्पर्धा! हान नदीकाठी स्पर्धक झोपले

■ सेऊल



**दक्षिण** कोरियाची राजधानी सेऊल येथे सध्या एक अनोखी स्पर्धा चर्चेचा विषय ठरली आहे. पॉवर नॅप कॉन्टेस्ट या नावाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत शेकडो नागरिकांनी केवळ झोप घेण्यासाठी सहभाग नोंदवला. हान नदी काठावरील उद्यानात पार पडलेल्या या उपक्रमाचे आयोजन सेऊल मेट्रोपॉलिटन गव्हर्नमेंटकडून करण्यात आले होते.

लोकांना विश्रांतीचे महत्त्व पटवून देणे आणि झोपेच्या समस्येकडे लक्ष वेधणे हा या स्पर्धेमागील उद्देश होता. दक्षिण कोरियामध्ये झपाट्याने बदलणारी जीवनशैली, नाईट लाइफ आणि कामाचा ताण यामुळे तरुणांमध्ये झोपेच्या समस्या वाढत आहेत. याचमुळे हा उपक्रम राबवण्यात आला. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी काही मजेशीर अटी ठेवण्यात आल्या होत्या. स्पर्धकांनी थकलेले असणे, पोटभर जेऊन येणे आणि स्लीपिंग ब्युटी किंवा स्लीपिंग प्रिन्ससारखी वेशभूषा करणे अपेक्षित होते. त्यामुळे अनेक स्पर्धक भन्नाट पोशाखात सहभागी झाले.

स्पर्धक किती शांत आणि गाढ झोपले आहेत, हे तपासण्यासाठी अधिकाऱ्यांकडून त्यांच्या हृदयाचे ठोके (हार्ट रेट) मोजले जात होते.

# आत्महत्या रोखण्यासाठी छताच्या पंख्यांवर जाळीचे पिंजरे

■ कोटा



**राजस्थानच्या** कोटा शहरात विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी वसतिगृहातील पंख्यांना लोखंडी जाळ्यांचे पिंजरे बसवण्यात आले आहेत. या वसतिगृहातील पिंजरे लावलेल्या पंख्यांचा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला आहे. कोटा हे अभियांत्रिकी आणि वैद्यकीय प्रवेश परीक्षा (जेईई, एनईईटी इत्यादी) तयारीसाठी भारतातील प्रमुख केंद्र मानले जाते. येथे दरवर्षी लाखो विद्यार्थी तयारीसाठी येतात.वसतिगृह प्रशासनाने हा सुरक्षा उपाय असल्याचे म्हटले असले तरी शिक्षणतज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांनी या निर्णयावर जोरदार टीका केली.

# 'एआय'च्या नावाखाली कर्मचारी कपात अयोग्य

■ बीजिंग

### चीनच्या न्यायालयाचा निर्णय

**कृत्रिम** बुद्धिमत्ता (एआय) वापरामुळे कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्याच्या प्रकारावर हांगझोऊ इंटरमिजियट पीपल्स न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. एआयचा वापर हा कर्मचारी कपात करण्यासाठी वैध कारण ठरू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

हे प्रकरण झोऊ नावाच्या कर्मचाऱ्याशी संबंधित आहे. २०२२ मध्ये तो एका एआय कंपनीत कार्यरत होता. कंपनीने त्याच्या कामासाठी एआयचा वापर वाढवून त्याला कमी पगारावर काम करण्यास सांगितले. त्याने नकार दिल्यानंतर त्याची सेवा समाप्त करण्यात आली. याविरोधात झोऊने लवादात धाव घेतली, जिथे त्याच्या बाजूने निकाल लागला.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# वसई-विरार विकास आराखड्याला मुदतवाढ
## भविष्यातील ५० लाख लोकसंख्येचे नियोजन

■ वसई

**वसई-विरार** शहराचा नवीन विकास आराखडा पुढील एक वर्षात तयार केला जाणार आहे. आगामी काळात शहराची लोकसंख्या ५० लाख होणार असल्याचे गृहीत धरून या विकास आराखड्याचे नियोजन केले जाणार आहे. हा आराखडा तयार करण्यासाठी महासभेने मुदतवाढ दिली आली.

वसई-विरारसाठी २००१ ते २०२१ या कालावधीसाठी विकास आराखडा तयार केला होता. मात्र या जुन्या विकास आराखड्याचा कालावधी उलटून तीन वर्षे उलटून गेली आहेत. ३० ऑक्टोबर २०२३ रोजी सुधारित आराखड्यासाठी पालिकेने नोटीस प्रसिद्ध केली होती. नियमानुसार हा आराखडा नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्रसिद्ध होणे आवश्यक होते. मात्र, निर्माण झालेल्या विविध तांत्रिक अडचणींमुळे विकास आराखडा अजूनही पूर्ण होऊ शकलेला नाही. महासभेत विकास आरखड्याला मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली होती. अखेर विकास आराखड्याला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. सध्या वसई-विरारची लोकसंख्या २५ लाख आहे.

# जोडीदाराच्या उत्पन्नाची माहिती 'आरटीआय'अंतर्गत मागवता येत नाही

■ नवी दिल्ली

**दिल्ली** उच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात म्हटले आहे की, एखाद्या व्यक्तीला माहिती अधिकार कायदाअंतर्गत अर्ज करून आपल्या जोडीदाराच्या उत्पन्नाची माहिती अधिकाऱ्यांकडून मिळवता येणार नाही. एका महिलेने देखभाल (मेंटेनन्स) प्रकरणाच्या सुनावणीसाठी ही माहिती आवश्यक असल्याचा दावा केला होता.

न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांनी सांगितले की, सार्वजनिक हिताशी संबंधित नसलेली वैयक्तिक माहिती ही माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८(१)(जे) अंतर्गत उघड करण्यापासून वगळलेली आहे.



महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा अजित पवार यांची बारामती मतदारसंघात विक्रमी मतांनी निवडून आल्यावर अभिनंदन करताना मुंबई कार्याध्यक्ष सिद्धार्थ टी.कांबळे व प्रदेश सरचिटणीस संजय तटकरे.

# धारावीत वरच्या मजल्याची पात्रता तळमजल्यावर ठरणार

### रहिवाशांचे शपथपत्र ग्राह्य धरले जाणार

■ मुंबई

**धारावी** पुनर्विकास प्रकल्पात वरच्या मजल्यावरील रहिवाशांची पात्रता ही प्रामुख्याने तळमजल्यावरील रहिवाशाच्या पात्रतेवर अवलंबून असणार आहे.४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार, जर तळमजल्यावरील घर किंवा गाळा पात्र ठरला, तरच त्यावरील वरच्या मजल्यावरील रहिवाशांचा हक्क सिद्ध करण्यासाठी शपथपत्र ग्राह्य धरले जाईल.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या आजवरच्या निकषांना बाजूला करत धारावी पुनर्विकास प्रकल्पात वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना देखील घर देण्याचा ऐतिहासिक निर्णय राबविला जाणार आहे. मात्र,वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांची पात्रता ही तळमजल्यावरील सदनिकाधारकाच्या पात्रतेवर अवलंबून असणार आहे. वास्तविक, ४ ऑक्टोबर २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार १५ नोव्हेंबर २०२२ पूर्वी धारावीत वास्तव्याला असलेल्या वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना देखील पुनर्विकासात सामावून घेतले जाणार आहे. या सदनिकाधारकांना धारावीबाहेर पण मुंबईतच ३०० चौरस फुटांचे घर मिळू शकेल. त्यासाठी त्यांना भाडेकरार खरेदी योजनेचा लाभ घेता येईल किंवा २५ वर्षांसाठी नाममात्र भाडे भरून २६ व्या वर्षी घरचा मालकी हक्क मिळवता येईल. तसेच उर्वरित रक्कम अदा करून २५ वर्षाच्या कालावधीत कधीही घराचे मालक होता येईल. वास्तविक, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना कोणताही लाभ न देता प्रकल्पातून वगळले जाते.मात्र,धारावी पुनर्विकास प्रकल्प याला अपवाद असणार आहे.

# बनावट जनगणना लिंकपासून सावध राहा! राज्य सरकारचे आवाहन

■ मुंबई

**जनगणना** २०२७ प्रक्रियेदरम्यान सोशल मीडियावर बनावट अर्ज व लिंक फिरत असल्याचे उघड झाले आहे. नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचा गैरवापर होऊ शकतो, त्यामुळे अशा लिंकपासून दूर राहावे, असे राज्य सरकारने आवाहन केले आहे.

सरकारने स्पष्ट केले आहे की, अधिकृत संकेतस्थळ व ॲपव्यतिरिक्त इतर कोणत्याही लिंकवर माहिती भरू नये. जनगणना यंदा प्रथमच डिजिटल स्वरूपात होत आहे. नागरिकांना 'स्व-गणना' सुविधेद्वारे स्वतः ची माहिती नोंदवण्याची संधी देण्यात आली आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने नागरिकांना केवळ https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करण्याचा सल्ला दिला आहे. सोशल मीडियावर फिरणारे अर्ज बनावट असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

स्व-गणनेसाठी १ मे ते १५ मे हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जूनदरम्यान घरगणना टप्पा पार पडणार आहे. नागरिकांनी वेळेत आणि अधिकृत माध्यमांद्वारे माहिती भरल्यास पुढील प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होणार आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील बोगस अर्जांना बळी न पडता अधिकृत माध्यमांचाच वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री
महाराष्ट्र राज्य लॉटरी • धनलक्ष्मी विकली लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 04/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SL-08 : 3772**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0200 | 0365 | 1045 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 1366 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 1607 (मातोश्री एन्टरप्रायझेस, खामगाव) | 6392 | 8251 | 8707 | 9490 | 9559 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0978 | 1238 | 1790 | 2433 | 3317 | 3374 | 4370 | 4693 | 5605 | 7806 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0540 | 1784 | 2935 | 3765 | 3784 | 4576 | 5338 | 6178 | 6700 | 7963 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0701 | 1475 | 2605 | 3455 | 5398 | 7100 | 8059 | 9132 |
| | 0720 | 1491 | 2629 | 4013 | 5515 | 7157 | 8074 | 9201 |
| 0001 | 0722 | 1494 | 2825 | 4307 | 5548 | 7270 | 8088 | 9258 |
| 0003 | 0977 | 1913 | 2925 | 4484 | 6157 | 7386 | 8189 | 9269 |
| 0007 | 1046 | 1951 | 2963 | 4613 | 6389 | 7509 | 8218 | 9319 |
| 0042 | 1090 | 2078 | 3094 | 4641 | 6476 | 7578 | 8262 | 9487 |
| 0093 | 1112 | 2172 | 3113 | 4643 | 6496 | 7625 | 8499 | 9581 |
| 0282 | 1116 | 2207 | 3229 | 4750 | 6632 | 7646 | 8639 | 9717 |
| 0303 | 1162 | 2230 | 3336 | 4874 | 6681 | 7742 | 8718 | 9721 |
| 0372 | 1248 | 2322 | 3353 | 4902 | 6747 | 7787 | 8758 | 9834 |
| 0445 | 1357 | 2337 | 3365 | 5015 | 6822 | 7847 | 8835 | 9873 |
| 0488 | 1396 | 2416 | 3431 | 5140 | 6916 | 8034 | 8846 | 9905 |
| 0610 | 1456 | 2421 | 3452 | 5385 | 6966 | 8052 | 8991 | 9930 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता.५/५/२०२६

| ० | १ | ६ |
|---|---|---|
| ०२ | १३ | ६३ |
| ०७ | १८ | ६८ |
| १३६ | १४६ | १६९ |
| २८० | २९० | २५९ |

## गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी
सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 04/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-04 : 3118**

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 1148 — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 2405 — जय जलाराम लॉटरीज् गोरेगाव

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0475 | 0889 | 1287 | 3039 | 3266 | 3816 | 6063 | 6226 | 8322 | 8789 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1025 | 1370 | 1466 | 2545 | 2606 | 2723 | 5092 | 6182 | 7587 | 7967 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0306 | 0763 | 1476 | 4225 | 5507 | 5543 | 8030 | 8457 | 9338 | 9743 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1510 | 2521 | 3383 | 4722 | 5502 | 6663 | 7577 | 8263 | 9107 |
| | | 1555 | 2534 | 3417 | 4746 | 5541 | 6674 | 7580 | 8280 | 9130 |
| | | 1576 | 2569 | 3530 | 4751 | 5552 | 6776 | 7699 | 8283 | 9137 |
| 0006 | 0797 | 1677 | 2599 | 3534 | 4752 | 5719 | 6807 | 7717 | 8347 | 9171 |
| 0019 | 0809 | 1839 | 2702 | 3628 | 4823 | 5767 | 6834 | 7733 | 8421 | 9175 |
| 0054 | 0816 | 1892 | 2720 | 3680 | 4884 | 5816 | 6843 | 7768 | 8458 | 9201 |
| 0070 | 0819 | 1941 | 2765 | 3850 | 4908 | 5858 | 6873 | 7807 | 8482 | 9299 |
| 0078 | 0847 | 2071 | 2998 | 3923 | 4925 | 5895 | 6876 | 7823 | 8486 | 9341 |
| 0108 | 0869 | 2120 | 3031 | 3925 | 4946 | 5920 | 6985 | 7853 | 8658 | 9447 |
| 0208 | 0872 | 2134 | 3033 | 3959 | 4981 | 6017 | 7028 | 7857 | 8691 | 9490 |
| 0263 | 0934 | 2175 | 3157 | 3963 | 4997 | 6023 | 7093 | 7863 | 8753 | 9576 |
| 0276 | 0950 | 2197 | 3182 | 4024 | 5058 | 6103 | 7157 | 7901 | 8758 | 9595 |
| 0301 | 1017 | 2232 | 3191 | 4037 | 5107 | 6166 | 7172 | 7957 | 8767 | 9612 |
| 0308 | 1104 | 2253 | 3230 | 4234 | 5158 | 6226 | 7177 | 7989 | 8801 | 9705 |
| 0320 | 1115 | 2272 | 3273 | 4427 | 5165 | 6248 | 7180 | 8065 | 8884 | 9707 |
| 0408 | 1179 | 2279 | 3301 | 4478 | 5230 | 6273 | 7197 | 8087 | 8889 | 9717 |
| 0470 | 1192 | 2282 | 3305 | 4488 | 5243 | 6368 | 7257 | 8142 | 8928 | 9788 |
| 0503 | 1275 | 2304 | 3319 | 4535 | 5333 | 6605 | 7276 | 8160 | 8967 | 9906 |
| 0524 | 1357 | 2310 | 3354 | 4614 | 5351 | 6637 | 7320 | 8169 | 8972 | 9929 |
| 0572 | 1438 | 2432 | 3357 | 4651 | 5354 | 6646 | 7370 | 8192 | 9035 | 9939 |
| 0700 | 1473 | 2516 | 3374 | 4714 | 5370 | 6649 | 7560 | 8241 | 9039 | 9970 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी
महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 18 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 04/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-00 : 9005**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0385 | 2013 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 2417 (रुख्मणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद) | 4844 | 6661 | 6995 | 8020 | 8276 | 8509 | 9339 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0979 | 1192 | 3484 | 3602 | 4221 | 4281 | 6442 | 6811 | 7950 | 8893 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0273 | 1495 | 2845 | 4920 | 5368 | 5995 | 7099 | 7461 | 7545 | 9920 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0013 | 0964 | 3231 | 3656 | 4560 | 5205 | 6325 | 6803 | 7309 | 7341 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 100/- | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1155 | 2207 | 3203 | 4307 | 4924 | 5575 | 6166 | 6877 | 8079 | 9330 |
| | | 1156 | 2222 | 3300 | 4340 | 4946 | 5581 | 6179 | 6963 | 8267 | 9396 |
| 0030 | 0422 | 1166 | 2260 | 3339 | 4341 | 4968 | 5583 | 6196 | 7073 | 8380 | 9402 |
| 0031 | 0430 | 1231 | 2267 | 3388 | 4346 | 5042 | 5584 | 6329 | 7179 | 8458 | 9414 |
| 0052 | 0501 | 1311 | 2269 | 3435 | 4347 | 5062 | 5659 | 6362 | 7267 | 8483 | 9415 |
| 0066 | 0504 | 1378 | 2347 | 3503 | 4397 | 5145 | 5665 | 6379 | 7331 | 8486 | 9507 |
| 0073 | 0544 | 1381 | 2362 | 3531 | 4402 | 5172 | 5720 | 6388 | 7364 | 8550 | 9540 |
| 0094 | 0574 | 1401 | 2386 | 3623 | 4409 | 5236 | 5772 | 6422 | 7427 | 8555 | 9576 |
| 0101 | 0690 | 1419 | 2492 | 3626 | 4420 | 5252 | 5786 | 6428 | 7557 | 8588 | 9598 |
| 0108 | 0713 | 1420 | 2526 | 3658 | 4425 | 5300 | 5810 | 6481 | 7576 | 8760 | 9638 |
| 0116 | 0732 | 1512 | 2622 | 3752 | 4454 | 5316 | 5905 | 6516 | 7604 | 8833 | 9689 |
| 0120 | 0753 | 1513 | 2623 | 3776 | 4460 | 5357 | 5922 | 6560 | 7619 | 8852 | 9706 |
| 0162 | 0809 | 1580 | 2688 | 3823 | 4483 | 5393 | 5932 | 6566 | 7684 | 8957 | 9765 |
| 0202 | 0910 | 1819 | 2710 | 3835 | 4565 | 5395 | 5964 | 6632 | 7717 | 9033 | 9802 |
| 0285 | 0920 | 1859 | 2756 | 3859 | 4644 | 5415 | 5975 | 6658 | 7721 | 9096 | 9894 |
| 0293 | 1002 | 1871 | 2774 | 3936 | 4676 | 5481 | 5985 | 6673 | 7764 | 9097 | 9909 |
| 0300 | 1010 | 1919 | 2782 | 4040 | 4716 | 5483 | 6013 | 6716 | 7766 | 9115 | 9919 |
| 0307 | 1061 | 2090 | 2850 | 4074 | 4786 | 5500 | 6023 | 6738 | 7770 | 9193 | 9922 |
| 0353 | 1068 | 2132 | 2999 | 4133 | 4798 | 5530 | 6096 | 6749 | 7934 | 9194 | 9936 |
| 0361 | 1093 | 2171 | 3030 | 4165 | 4848 | 5539 | 6106 | 6803 | 7975 | 9204 | 9972 |
| 0375 | 1120 | 2172 | 3039 | 4241 | 4871 | 5558 | 6116 | 6804 | 8025 | 9239 | 9977 |
| 0420 | 1131 | 2180 | 3132 | 4244 | 4880 | 5559 | 6117 | 6825 | 8064 | 9300 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# तरुणाच्या डोक्यात कोयता अडकला
## स्वत: चालत सायन रुग्णालयात दाखल

■ मुंबई

**सायन** परिसरात एका तरुणावर धारदार कोयत्याने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात कोयता थेट त्याच्या डोक्यात अडकला. एवढ्या गंभीर अवस्थेतही हा तरुण स्वतःच उपचारासाठी सायन रुग्णालयात चालत पोहोचला. या अंगावर शहारे आणणाऱ्या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

संबंधित तरुणाचा काही व्यक्तींशी वाद झाला होता. या वादाचे रुपांतर हिंसाचारात झाले आणि त्याच्यावर कोयत्याने हल्ला झाला. हल्लेखोरांनी केलेल्या वारात कोयता थेट त्याच्या डोक्यात घुसला आणि तिथेच अडकून राहिला. गंभीर जखमी असूनही त्या तरुणाने धैर्य दाखवत स्वतःला सावरले आणि कोणतीही मदत न घेता तो थेट सायन रुग्णालयात दाखल झाला.

रुग्णालयात पोहोचल्यावर त्याची अवस्था पाहून उपस्थित नागरिक आणि वैद्यकीय कर्मचारी थक्क झाले.

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी
महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 18 • सोडत दिनांक 04/05/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **SL-05 : 9308**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- : पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 9308 — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 9640 — डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3898 | 4673 | 5380 | 5438 | 7364 | 8308 | 8709 | 9170 | 9446 | 9697 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0051 | 1240 | 2425 | 2745 | 3516 | 5627 | 7331 | 7934 | 9271 | 9773 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0582 | 0689 | 0927 | 1505 | 4019 | 5577 | 6812 | 8720 | 9422 | 9524 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1529 | 1690 | 3427 | 3704 | 5405 | 6030 | 7989 | 8391 | 9865 | 9947 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1239 | 2214 | 2950 | 3547 | 4199 | 5055 | 5885 | 6603 | 7190 | 7937 | 8794 | 9392 |
| | | 1244 | 2216 | 2954 | 3593 | 4200 | 5079 | 5895 | 6609 | 7191 | 7952 | 8806 | 9398 |
| | | 1264 | 2222 | 2999 | 3622 | 4209 | 5105 | 5938 | 6612 | 7212 | 7958 | 8825 | 9417 |
| | | 1278 | 2228 | 3000 | 3637 | 4213 | 5125 | 5955 | 6620 | 7235 | 7975 | 8828 | 9432 |
| | | 1298 | 2229 | 3001 | 3641 | 4229 | 5156 | 5959 | 6623 | 7271 | 7978 | 8847 | 9433 |
| 0006 | 0530 | 1300 | 2242 | 3006 | 3663 | 4245 | 5208 | 5963 | 6624 | 7274 | 7981 | 8849 | 9496 |
| 0018 | 0550 | 1314 | 2243 | 3027 | 3718 | 4253 | 5245 | 5966 | 6625 | 7307 | 8012 | 8852 | 9501 |
| 0043 | 0615 | 1319 | 2250 | 3028 | 3746 | 4265 | 5280 | 5989 | 6636 | 7379 | 8082 | 8854 | 9522 |
| 0048 | 0681 | 1350 | 2268 | 3033 | 3804 | 4387 | 5287 | 6006 | 6650 | 7435 | 8084 | 8861 | 9557 |
| 0053 | 0744 | 1397 | 2282 | 3043 | 3827 | 4389 | 5304 | 6021 | 6658 | 7439 | 8092 | 8863 | 9574 |
| 0055 | 0778 | 1405 | 2284 | 3092 | 3828 | 4404 | 5313 | 6068 | 6676 | 7448 | 8107 | 8873 | 9596 |
| 0068 | 0780 | 1441 | 2288 | 3123 | 3829 | 4412 | 5374 | 6076 | 6732 | 7474 | 8112 | 8880 | 9687 |
| 0071 | 0806 | 1456 | 2359 | 3133 | 3839 | 4413 | 5376 | 6119 | 6766 | 7482 | 8120 | 8881 | 9692 |
| 0084 | 0825 | 1508 | 2392 | 3143 | 3843 | 4417 | 5405 | 6176 | 6773 | 7497 | 8166 | 8888 | 9710 |
| 0089 | 0881 | 1509 | 2421 | 3165 | 3854 | 4425 | 5435 | 6223 | 6859 | 7501 | 8178 | 8899 | 9738 |
| 0104 | 0893 | 1510 | 2434 | 3201 | 3860 | 4437 | 5495 | 6263 | 6861 | 7511 | 8179 | 8906 | 9748 |
| 0116 | 0907 | 1531 | 2443 | 3219 | 3864 | 4443 | 5504 | 6273 | 6866 | 7597 | 8194 | 8924 | 9750 |
| 0132 | 0952 | 1558 | 2480 | 3230 | 3878 | 4448 | 5505 | 6274 | 6876 | 7607 | 8196 | 8940 | 9767 |
| 0140 | 0990 | 1560 | 2492 | 3237 | 3883 | 4454 | 5509 | 6300 | 6885 | 7639 | 8233 | 8950 | 9776 |
| 0173 | 1014 | 1567 | 2505 | 3239 | 3890 | 4463 | 5524 | 6320 | 6940 | 7644 | 8244 | 8970 | 9803 |
| 0189 | 1017 | 1600 | 2526 | 3249 | 3895 | 4465 | 5530 | 6325 | 6984 | 7673 | 8314 | 9019 | 9804 |
| 0194 | 1035 | 1602 | 2551 | 3302 | 3924 | 4479 | 5536 | 6350 | 6986 | 7681 | 8328 | 9091 | 9826 |
| 0204 | 1036 | 1667 | 2567 | 3305 | 3939 | 4498 | 5551 | 6352 | 6996 | 7697 | 8332 | 9093 | 9830 |
| 0221 | 1081 | 1718 | 2620 | 3311 | 3943 | 4549 | 5558 | 6367 | 7006 | 7699 | 8380 | 9098 | 9847 |
| 0228 | 1086 | 1758 | 2625 | 3333 | 3946 | 4585 | 5565 | 6407 | 7014 | 7703 | 8406 | 9118 | 9881 |
| 0243 | 1102 | 1814 | 2652 | 3336 | 3954 | 4625 | 5573 | 6416 | 7030 | 7723 | 8426 | 9137 | 9894 |
| 0251 | 1103 | 1815 | 2655 | 3338 | 3963 | 4637 | 5574 | 6436 | 7050 | 7724 | 8440 | 9157 | 9898 |
| 0267 | 1114 | 1933 | 2660 | 3339 | 3971 | 4644 | 5576 | 6465 | 7051 | 7725 | 8441 | 9190 | 9904 |
| 0269 | 1115 | 1939 | 2674 | 3347 | 4006 | 4707 | 5582 | 6466 | 7054 | 7726 | 8466 | 9192 | 9925 |
| 0270 | 1118 | 1972 | 2702 | 3353 | 4017 | 4724 | 5619 | 6469 | 7057 | 7740 | 8485 | 9194 | 9926 |
| 0280 | 1120 | 1988 | 2771 | 3357 | 4061 | 4749 | 5645 | 6470 | 7073 | 7741 | 8491 | 9205 | 9937 |
| 0300 | 1143 | 2001 | 2792 | 3370 | 4079 | 4780 | 5652 | 6486 | 7077 | 7743 | 8511 | 9223 | 9942 |
| 0309 | 1146 | 2002 | 2883 | 3375 | 4092 | 4806 | 5654 | 6496 | 7079 | 7753 | 8580 | 9261 | 9947 |
| 0333 | 1158 | 2037 | 2906 | 3382 | 4114 | 4894 | 5655 | 6499 | 7089 | 7766 | 8581 | 9266 | 9948 |
| 0365 | 1169 | 2045 | 2912 | 3390 | 4137 | 4924 | 5675 | 6520 | 7094 | 7769 | 8603 | 9268 | 9949 |
| 0404 | 1183 | 2055 | 2922 | 3403 | 4153 | 4930 | 5731 | 6545 | 7097 | 7773 | 8605 | 9269 | 9952 |
| 0469 | 1190 | 2058 | 2925 | 3423 | 4166 | 4948 | 5778 | 6547 | 7137 | 7776 | 8678 | 9279 | 9969 |
| 0490 | 1196 | 2062 | 2927 | 3492 | 4169 | 5027 | 5856 | 6559 | 7175 | 7827 | 8751 | 9299 | 9975 |
| 0504 | 1210 | 2183 | 2929 | 3520 | 4173 | 5036 | 5862 | 6591 | 7178 | 7857 | 8753 | 9315 | 9992 |
| 0506 | 1215 | 2192 | 2944 | 3542 | 4186 | 5052 | 5884 | 6594 | 7186 | 7907 | 8776 | 9338 | 9993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# आजचे राशी भविष्य

मंगळवार ता. ५ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| रास | भविष्य |
|---|---|
| मेष | अधीरपणावर ताबा ठेवावा लागेल. लहरीपणा टाळा. थकवा जाणवेल. |
| वृषभ | आर्थिक प्रगतीचा दिवस. बचतीत वाढ होईल. अंगभूत गुणांना वाव मिळेल. |
| मिथुन | लोकसंपर्कासाठी चांगला दिवस. नवीन लोकांच्या गाठीभेटी होतील. मित्रपरिवारात वाढ होईल. |
| कर्क | ऐषोआरामासाठी अनुकूल दिवस. आनंदी राहील. थोड्या प्रयत्नानेही अधिक यश लाभेल. |
| सिंह | काही कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागेल. एकटेपणा जाणवेल. कामावर लक्ष केंद्रित करा. |
| कन्या | अवघड परिस्थिती संयमाने हाताळा. प्रियजनांशी बोलताना उद्वेग ताब्यात ठेवा. सहकाऱ्यांशीही जपून बोला. |
| तूळ | अनपेक्षित लाभाचे योग. पाहुण्यांचे आगमन आनंदाचे ठरेल. नोकरीत अर्थलाभ. |
| वृश्चिक | उद्दिष्टपूर्तीसाठी दिवस अनुकूल नाही. तणाव दूर ठेवा. लवचिक वृत्ती उपयोगी ठरेल. |
| धनु | दगदग होईल. मानसिक अस्वस्थता राहील. संयम राखणे हिताचे ठरेल. |
| मकर | कष्टाचे फळ मिळेल. कामाच्या दगदगीचा ताण येईल. सांधेदुखीपासून जपा. |
| कुंभ | सर्वांगीण उत्कर्ष होईल. कठोर मेहनतीची फळे चाखता येतील. नोकरीत अर्थलाभ. |
| मीन | प्रसंगावधानामुळे लाभ होईल. काटकोर नियोजन सफलता मिळवून देईल. मोठे यश लाभेल. |

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अकारण मनस्ताप देणारा बारावीचा निकाल

**नुकताच** लागलेला बारावी परीक्षेचा निकाल आणि दरवर्षीप्रमाणे यंदाही या निकालात मुलींनी बाजी मारलेली आहे. एकूण १४ लाख ३३ हजार ५८ विद्यार्थी परीक्षेला बसले त्यापैकी १२ लाख ८६ हजार ८४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकूण ८९.७९ टक्के संपूर्ण राज्याचा बारावीचा निकाल लागला आहे. गेल्या वर्षी तो ९१.८८ टक्के होता. विशेष म्हणजे या उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये ९३.१५ टक्के विद्यार्थिनींची संख्या आहे तर ८६.८० टक्के मुलांचे प्रमाण आहे. विशेष म्हणजे या १४ लाख विद्यार्थ्यांमध्ये जवळपास ७ लाख ३५ हजार १०२ विद्यार्थी हे विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेतून २ लाख ६७ हजार ३०० विद्यार्थी तर वाणिज्य शाखेतून २ लाख ६० हजार ४०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. याचा अर्थ विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान शाखा घेण्याकडे सर्वाधिक कल असल्याचे त्यातून सिद्ध होते. याचे कारण म्हणजे विज्ञान शाखा घेतल्यानंतर अन्य महत्त्वाच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेता येतो. वैद्यकीय, पशुवैद्यकीय, अभियांत्रिकी, औषध निर्माण, एवढेच नव्हे तर तंत्रज्ञानाशी संबंधित मग अगदी मुद्रण शास्त्र पदवी असेल किंवा याबरोबरच बीएससी, एमएससी हे अभ्यासक्रम पूर्ण करून मायक्रोबायलॉजी, लाईफ सायन्स, फोरेन्सिक, आर्टिफिशिअल इंटिलिजन्ससाठीसुद्धा बारावी विज्ञानशाखा उत्तीर्ण असणे गरजेचे असते. विज्ञान शाखेमुळे विविध क्षेत्रातल्या करिअरसाठी अधिक संधी उपलब्ध होतात. आणि म्हणूनच विज्ञान शाखा घेतलेल्यांना बारावीनंतर संयुक्त प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. त्यात केंद्र सरकार, राज्य सरकार शिवाय अ‍ॅडव्हान्स नावाची एक प्रवेश परीक्षा असते. परंतु यात राज्यातर्फे घेतली जाणारी सीईटी परीक्षा विद्यार्थ्यांसाठी अधिक महत्त्वाची असते. बारावीच्या गुणांपेक्षाही या प्रवेश परीक्षेतल्या गुणवत्तेतूनच त्यांचे पुढचे भवितव्य निश्चित होत असते. यावेळच्या निकालात उत्तीर्णांची टक्केवारी कमी झालेली आहे.

### मंडळाकडे एवढेही तारतम्य नाही

आणखी एका कारणासाठी यावेळच्या निकालाच्या पद्धतीवर समाजमाध्यमातून प्रचंड टीकाही झालेली आहे. उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने आपली बौद्धिक दिवाळखोरी दाखवून संयुक्त परीक्षेच्या आधी हा निकाल जाहीर केल्याने अनेक पालकांनी यासंदर्भात प्रचंड संताप व्यक्त केला. आतापर्यंतच्या परंपरेप्रमाणे दहावी बारावीचे निकाल साधारणपणे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच लागत आलेले आहेत. विशेष म्हणजे संयुक्त प्रवेश परीक्षा किंवा सीईटी परीक्षा झाल्यानंतरच घोषित झालेले पाहायला मिळतात. मग याच वर्षी अगदी मे महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात निकाल जाहीर करून शालांत परीक्षा मंडळाने असा कोणता मोठा तीर मारला आहे. निकाल लांबू नयेत. परंतु ते इतक्या लवकर लागतील याची कोणालाही अपेक्षा नव्हती. खूप लवकर निकाल जाहीर करून आपली कार्यक्षमता सिद्ध करण्याचा मंडळाचा प्रयत्न असेल तर तोदेखील अत्यंत भाबडा म्हणावा लागेल. बारावीची परीक्षा हा लाखो विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याचा एक निर्णायक टप्पा असतो. त्याचे निकाल लावताना सर्व प्रकारची काळजी घेतली जाते. विशेष म्हणजे मंडळाकडे कोणत्या शाखेला किती विद्यार्थी बसले आहेत याची संपूर्ण आकडेवारी होती. पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थी हे विज्ञान शाखेचे विद्यार्थी असतील. तर त्यांना बारावीची परीक्षा संपल्या संपल्या सीईटीच्या परीक्षांची तयारी सुरू करावी लागते. विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेपेक्षाही प्रवेश परीक्षेचा सर्वाधिक ताण असतो. कारण त्यात मिळणाऱ्या गुणांच्या आधारावरच अनेक महत्त्वाच्या अभ्यासक्रमांचे प्रवेश निश्चित होत असतात. परीक्षेला बसलेल्या पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची ही मानसिकता उच्च माध्यमिक मंडळाने लक्षात घेणे गरजेचे होते. परंतु तितका चतुरस्त्र किंवा चौकसपणा किंवा सावधपणा मंडळाला दाखवता आला नाही. बारावीचे निकाल आधीच जाहीर झाल्याने अनेक विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती निश्चितच डळमळीत झालेली असू शकते. कारण यातले लाखो विद्यार्थी असे असतात की, ज्यांना बारावीच्या परीक्षेत अपेक्षेप्रमाणे गुण मिळत नाहीत. पण संयुक्त प्रवेश परीक्षेत ते चांगली बाजी मारून जातात. डोक्यावर सतत परीक्षांचा हा ताण असताना मंडळाने अगदी संयुक्त परीक्षेच्या एक दिवस आधीच बारावीच्या निकालाचा नवा बोजा विद्यार्थ्यांच्या डोक्यावर टाकण्याचे कारणच नव्हते. संतप्त पालकांकडून समाजमाध्यमांवर व्यक्त झालेल्या प्रतिक्रिया जर पाहिल्या तर त्यांचा संताप रास्त ठरतो. कारण परीक्षा मंडळाला स्वतःच्या कारभाराची अधिक चिंता दिसते. निकाल जाहीर करून सुट्ट्या उपभोगायला मंडळ मोकाट राहते अशीदेखील सडकून टीका झालेली आहे.

### मंडळाने माफी मागितली पाहिजे

मंडळाने थोडी सावधगिरी बाळगली असती आणि संयुक्त प्रवेश परीक्षेच्या एक दिवस नंतर बारावीचा निकाल जाहीर केला असता तर कोणतेही आकाश कोसळणार नव्हते. याचा अर्थ संयुक्त परीक्षा घेणारी यंत्रणा आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्यातही फारसा समन्वय दिसत नाही. खरे तर दोन्ही यंत्रणा विद्यार्थ्यांच्याच हिताचा विचार करणाऱ्या असत्या तर त्यांना ही बाब निश्चितपणे खटकली असती. आगाऊ निकाल लावण्याचा मंडळाचा हा आगाऊपणा लाखो विद्यार्थी आणि पालकांना मनस्ताप देणारा ठरला. याबद्दल मंडळाने निश्चितच दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. आणि पुढच्या काळात किमान राज्याची संयुक्त प्रवेश परीक्षा झाल्यानंतरच बारावीचे निकाल घोषित केले पाहिजेत. आणखी एक प्रकार म्हणजे यंदाचा हा निकाल कमी लागला. कारण यंदा कॉपीमुक्त अभियान राबवले गेल्याचे मंडळाकडून सांगितले गेले आहे. अशा पद्धतीने कॉपी प्रकरणातून जवळपास दोन अडीच टक्के विद्यार्थी नापास होत असतील तर हे कॉपीमुक्त अभियान अधिक प्रभावीपणे राबवले गेले पाहिजे. अजूनही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर कॉपी होत असते. यावर्षीच्या अभियानातून जर काही सकारात्मक परिणाम दिसत असतील तर हे अभियान परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

ज्याला स्वतःच्या मनाची शांतता जपायला जमली तोच या जगातला सर्वात श्रीमंत आणि आनंदी माणूस.

## पं चां ग

मंगळवार, ५ मे २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर

* वैशाख कृष्ण चतुर्थी
* नक्षत्र : ज्येष्ठा



रवी उदय- ०६-१०
रवी अस्त- १९-०१

-: जन्मराशी :-
००-०१ ते १२-५४ वृश्चिक
१२-५५ ते २४-००

**अंगारकी संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री १०.१९**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## पनीर शिमला मिर्चीची भाजी



★ **साहित्य :** दोनशे ग्रॅम पनीर, दोन सिमला मिरच्या चौकोनी फोडी करून, दोन कांदे चौकोनी फोडी करून, चार हिरव्या मिरच्या मोडून, एक चहाचा चमचा ताजी कुटलेली भरड काळीमिरी, दोन पळ्या तेल, फोडणीसाठी जिरे आणि हिंग, पाव वाटी कोथिंबीर बारीक चिरून, मीठ चवीनुसार

★ **कृती-** पॅनमध्ये तेल गरम करून जिरे, हिंग तडतडू द्या. हिरव्या मिरच्यांचे तुकडे आणि कांदा घालून पारदर्शक होईपर्यंत परता.

सिमला मिरचीच्या फोडी घालून परता. लगेचच पनीर जाडसर कुस्करून घाला, छान परता. पनीरला सुटलेले पाणी आटवून घ्या. काळीमिरी पूड, मीठ, कोथिंबीर घालून भाजी थोडी ओलसर राहील अशी झाली की, गॅस बंद करा. चपाती, पोळी, पुरी, पराठे, फुलके यापैकी कशाहीसोबत गरमागरम आस्वाद घ्या.




# मुंबईचा लखनौवर ६ विकेट राखून विजय

## रोहित शर्मा, रिकेल्टनची धडाकेबाज खेळी

**सलामीवीर रोहित शर्मा (८४) आणि रायन रिकेल्टन (८३) यांच्या वादळी भागीदारीच्या बळावर मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंट्सवर ६ विकेट आणि ८ चेंडू राखून विजय मिळवला. या पराभवासह लखनौचा संघ आयपीएलच्या प्लेऑफमधून कायमचा बाहेर पडला. या सामन्यात लखनौने मुंबईपुढे विजयासाठी २२८ धावांचे आव्हान दिले होते. ते मुंबईने ४ गडी गमावून १८.४ षटकांत पूर्ण करून विजय मिळवला.**

■ मुंबई

**मुंबई** इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. मिचेल मार्श आणि जोश इंग्लिस या सलामीच्या जोडीने संघासाठी २.२ षटकांत २९ धावा केल्या होत्या. मात्र पुढच्या चेंडूवर एएम घझनफरने जोश



इंग्लिसला १३ धावांवर बाद केले. निकोलस पूरन आणि मिचेल मार्श यांनी मुंबईच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेऊन चौकार आणि षटकार ठोकले. या जोडीने संघाची धावसंख्या ८ षटकांत १ बाद १२३ वर पोहोचवली. मग कॉर्बिन बॉशने नवव्या षटकात पूरन आणि मार्श यांना एकामागून एक तंबूत धाडले. ऋषभ पंत १० चेंडूंत १५ धावा करून माघारी परतला. त्याची विकेट विल जॅक्सने घेतली. रघु शर्माने अक्षत रघुवंशीला ७ चेंडूत ११ धावांवर बाद केले. एडन मार्कराम आणि हिम्मत सिंग यांनी अनुक्रमे २५ चेंडूत नाबाद ३१ आणि ३१ चेंडूत नाबाद ४० धावा केल्यामुळे लखनौने निर्धारित षटकात ५ बाद २२८ धावांपर्यंत मजल मारली.

या धावसंख्येचा पाठलाग करताना मुंबईची सुरुवात चांगली झाली. रोहित शर्मा आणि रायन रिकेल्टन यांनी सुरुवातीपासून लखनौच्या गोलंदाजांवर आक्रमण केले. रिकेल्टनने २२ चेंडूत आणि रोहित शर्माने २७ चेंडूत एकापाठोपाठ एक अर्धशतक पूर्ण केले. या जोडीने संघासाठी १०.४ षटकांत १४३ धावा ठोकल्या आणि विजयाचा पाया रचला. दोघेही आपले शतक पूर्ण करतील असे वाटत असताना ते एकामागून एक तंबूत परतले. त्यांनी अनुक्रमे ३२ चेंडूत ८३ आणि ४४ चेंडूत ८४ धावा केल्या. तिलक वर्मा ११ धावा करून बाद झाला. सूर्यकुमार यादवही १२ धावा करून माघारी परतले. वील जॅक्स आणि नमन धीर यांनी संघाचा मोर्चा सांभाळून संघाला १८.४ षटकांत विजय मिळवून दिला.

**जाहिर नोटीस (अपील क्र. १०/२०२६)**

सुरज गोविंद देवळेकर ..........अपिलार्थी
विरुद्ध
मा. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी-१
धारावी पुनर्विकास प्रकल्प व इतर ०६ ..............उत्तरार्थी

प्रति,
१. अध्यक्ष सचिव
आझादनगर बी वॉर्ड सह. गृह. संस्था,
माटुंगा मुंबई-४०० ०१९. ......उत्तरार्थी क्र. ०२
२. विकासक-
नवभारत मेघा डेव्हलपर्स,
आर.पी.एफ बिल्डींगजवळ, टि.एच.कटारिया मार्ग,
माटुंगा मुंबई -४०० ०१९ ....उत्तरार्थी क्र.०३
३. प्रणव राजाराम कळवणकर
बी.२९,१/२, आझादनगर टि.एच.कटारिया मार्ग
राजन स्टोअर, माटुंगा मुंबई-४०० ०१९ ..... उत्तरार्थी क्र. ०४
४. राजाराम दिनकर कळवणकर
बी.२९, १/२, आझादनगर, टि.एच.कटारिया मार्ग,
राजन स्टोअर, माटुंगा मुंबई-४०० ०१९ ... उत्तरार्थी क्र. ०५
५. अच्छेलाल यादव
बी.२९. १/२. आझादनगर, टि.एच.कटारिया मार्ग,
राजन स्टोअर, माटुंगा मुंबई-४०० ०१९ ..... उत्तरार्थी क्र. ०६
६. दिनेश महानंद सरोज
बी.२९, १/२, आझादनगर, टि.एच.कटारिया मार्ग,
राजन स्टोअर, माटुंगा मुंबई-४०० ०१९ .... उत्तरार्थी क्र. ०७

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट मुंबई ४००००१ येथे **आझादनगर बी वॉर्ड सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परि-II मधील अ.क्र. ७०२ वर प्रणव राजाराम कळवणकर यांचे नाव नमुद असून सदर संस्थेच्या परि II मधील अ.क्र.७०२ वरील आपले नाव कमी करून स्वतःचे नाव समाविष्ट करून पात्र करणेसाठी अपिलार्थी यांनी अपील अर्ज दाखल केलेला असून आपणांस उत्तरार्थी क्र. ०४ केलेले आहे. तसेच प्रश्नांकित/दावा केलेली झोपडी आपणाकडून खरेदी केलेली असल्याने आपणांस उत्तरार्थी क्र. ०५,०६,०७ केले आहे. अपिलार्थी यांनी संस्था व विकासक यांना उत्तरार्थी क्र. ०२ व ०३ केले आहे.** प्रकरणी दि. २४.०४.२०२६ रोजीचे सुनावणी मध्ये आपण गैरहजर असल्याने मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहेत.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणांमध्ये आपण उत्तरार्थी क्र. ०२,०३,०४,०५,०६, व ०७ असून, **दि. १२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात सुनावणी आयोजित केलेली आहे. तरी सदर सुनवाणीस आपण उपस्थित/हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरून प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

सही/-
सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर

# शालेय सांघिक कॅरम स्पर्धेत आनंदसागर फिनिशर्स विजेता

■ मुंबई

**लाईफ** इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत एलआयसी आनंदराव अडसूळ ट्रस्ट ट्रॉफी शालेय मुलामुलींच्या सांघिक कॅरम स्पर्धेत आनंदसागर फिनिशर्सने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात आनंदसागर फिनिशर्सने आनंदराव अडसूळ प्लॅटीनमवर २-१ असा विजय मिळविताना राष्ट्रीय दर्जाचे सबज्युनियर कॅरमपटू पुष्कर गोळे व तनया दळवी यांनी अप्रतिम खेळ केला.

आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे राज्यातील निवडक शालेय मुलामुलींच्या सांघिक कॅरम स्पर्धेमधील तृतीय क्रमांकाच्या सामन्यात कॅप्टन अभिजित चॅम्पियन्स संघाने बाजी मारली. जैतापूरचा कॅरमपटू आर्यन राऊतच्या यशस्वी नेतृत्वामुळे कॅप्टन अभिजित चॅम्पियन्स संघाने सीबीईयु वॉरियर्सचे आव्हान २-१ असे संपुष्टात आणले. सीबीईयु वॉरियर्सचा पराभव टाळण्यासाठी उमैर पठाण, तीर्थ ठाकर यांनी शर्थीचे प्रयत्न केले. या स्पर्धेतील सर्वोत्तम कॅरमपटू पुष्कर गोळे ठरला.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर सुचना**

२२०/२२ के.व्ही. पाल ईएचव्ही स्विचींग स्टेशन व १००/२२ के.व्ही. डोंबिवली ईएचव्ही स्विचींग स्टेशन मधून निघणाऱ्या खालील वाहिन्या देखभाल व दुरूस्तीचे कामाकरिता खाली दिलेल्या दिनांक व वेळेत बंद राहणार असुन या काळात कल्याण (पूर्व) विभागामधील खालील परिसरातील विद्युत पुरवठा पुर्णपणे बंद राहील याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व म.रा.वि.वि.कंपनीस सहकार्य करावे ही विनंती.

| वाहिनीचे नाव | दिनांक | वेळ | प्रभावित क्षेत्र |
|---|---|---|---|
| २२ के.व्ही. आजदे वाहिनी क्रं. ३०८ | ०५.०५.२०२६ | ०८.०० ते १२.०० | सागर्ली, पाथर्ली, आजदे, घारडा सर्कल परिसर |
| २२ के.व्ही. लोढा टेस्ट वाहिनी क्रं. ३१० | ०६.०५.२०२६ | ०८.०० ते १२.०० | कटाई, निळजे, लोढा हेवन |

कार्यकारी अभियंता,
कल्याण (पूर्व) विभाग

सिडको
शहरांचे शिल्पकार

**प्रस्ताव मागविणारी सूचना**

**"विमानतळाच्या प्रभाव क्षेत्राची देखरेख"**
**करिता एजन्सीची नियुक्ती**

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित महाराष्ट्र हे खाली नमूद केलेल्या तपशिलानुसार **"विमानतळाच्या प्रभाव क्षेत्राची देखरेख"** करिता एजन्सीची नियुक्तीकरिता, पात्रतेच्या निकषाच्या आधारे स्वतःस पात्र असल्याचे समजणाऱ्या नामांकित एजन्सींकडून ई-निविदा प्रक्रियेद्वारे "ऑनलाईन" प्रस्तावाकरिता विनंती (आरएफपी) मागवित आहेतः

**१. कामाचे नाव : विमानतळाच्या प्रभाव क्षेत्राची देखरेख" करिता एजन्सीची नियुक्ती. २. विभागः** टी ॲण्ड सी विभाग **३. सी. ए. क्र.:** १/सीजीएम(टीॲण्डए)/टीई(एअरपोर्ट ॲण्ड नैना-१)/२६-२७. **४. बोली सुरक्षा:** रु. ४६,०००/- (रुपये सेहेचाळीस हजार मात्र) **५. कामाचा कालावधी:** २ वर्षे, **६. निवडीची पद्धतः** गुणवत्ता आणि मूल्य निवड पद्धत **७. आरएफपी शुल्क :** रु. १,८००/- (रुपये एक हजार आठशे मात्र) - १८% दराने जीएसटी समाविष्ट, ना-परतावा.

बोलीचे वेळापत्रक आणि बोली प्रपत्रे सिडको लि.ची अधिकृत वेबसाईट म्हणजेच http://mahatenders.gov.in वर दि. ०५.०५.२०२६ रोजी पासून उपलब्ध होतील.

प्रमुख महाव्यवस्थापक
(परिवहन आणि विमानतळ)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०५३/२०२६-२७

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सुचना क्र.२०/२०२६**

खालील कामांसाठी म.औ.वि.महामंडळ नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद ई-निविदा मागवित आहे. सदर ई-निविदा (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रूपये | कोरी ई- निविदा उपलब्ध कालावधी |
|---|---|---|---|
| अ) | **का.अ., मऔविम, विवयां. विभाग, पुणे** | | |
| १ | तळेगाव औद्योगिक क्षेत्र...... तळेगाव टप्पा क्र १ व २ ला जोडणाऱ्या सहा पदरी रस्त्याच्या मध्यातुन एच टी ओव्हर हेड लाईन बदलवून जमिनीखालून टाकणे तसेच डिटीसी सह हायमास्ट व पथदिवे पुरवणे, उभारणे व चाचणी करून कार्यन्वयन करणे. | २,११,३२,५४५/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| २ | चाकण औद्योगिक क्षेत्र... टप्पा क्र ५... पायाभुत सुविधा पुरविणे.. चाकण टप्पा क्र ५ मधील एच टी व एल टी लाईन शिफ्ट करणे. | २,६३,५९,१५६/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ३ | तळेगाव औद्योगिक क्षेत्र ... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... तळेगाव चाकण पाणी पुरवठा योजनेतील शुध्द व अशुध्द जल उदंचन क्रेंद्राच्या कार्यवहनासाठी मनुष्यबळ पुरविणे. | ३८,६७,१७५/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ४ | पाणी पुरवठेची देखभाल व दुरुस्ती... रावेत, तळेगाव, हिंजवडी, रांजणगाव आणि अहिल्यानगर पाणी पुरवठा केंद्रे येथे द्रवरूप क्लोरीन वायुचा पुरवठा करणे. | ४९,९९,६८०/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ब) | **का.अ., मऔविम, बारामती विभाग, बारामती** | | |
| १ | बारामती औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती... नव्याने बांधलेल्या बस डेपोमधील विद्यमान २०० मि.मी. व्यासाच्या डीआय पाईपलाईनच्या जागी २०० मि.मी. डीआयके-७ पाईपलाईन बदलणे. | १०,२५,३९८/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| २ | जेजुरी औद्योगिक क्षेत्र... पर्यायी पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती... वीर धरण ते जेजुरीपर्यंत पाणी पुरवठा योजनेची आवश्यकतेनुसार देखभाल व दुरूस्ती आणि सुरक्षा प्रदान करणे. | १५,११,१००/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ३ | जेजुरी औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती... जेजुरी लोणंद येथील पर्यायी अशुध्द जल उदंचन वाहिनीची दुरूस्ती करणे. | १५,९८,६५६/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ४ | बारामती औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती... बारामती डब्ल्यूटीपी येथील ५० एचपी व ४० एचपी व्हीटी पंपाची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे व संबंधित कामे करणे. | २२,६९,८८५/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ५ | जेजुरी औद्योगिक क्षेत्र... पर्यायी पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती... श्री राजेश नरावत बिरे यांच्या मालकीच्या गट क्र.२६३१ या भूखंडासमोर, सीएच ६.९५ ते सीएच ७.७५ दरम्यान असलेल्या विद्यमान २५० मि.मी. व्यासाची एमएस पाईपलाईन बदली करणे. | ३३,९८,३८३/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ६ | बारामती औद्योगिक क्षेत्र... रस्ते देखभाल व दुरूस्ती... बारामती औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यावर गतिरोधक प्रदान करणे, खड्डे भरणे तसेच मऔविमचे फलक रंगविणे. | ३९,९१,२०३/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| क) | **का.अ., मऔविम, सांगली विभागांतर्गत सोलापूर उपविभाग, सोलापूर.** | | |
| १ | टेंभुर्णी (माढा) (वि.कें.) औद्योगिक क्षेत्र... टेंभुर्णी औद्योगिक क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरूस्ती. जलशुध्दीकरण केंद्र टेंभुर्णी येथे पॉली ॲल्युमिनियम क्लोराईडचा आणि द्रवरूप क्लोरिन सिलिंडरचा पुरवठा करणे. | ९,९३,८४०/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| २ | टेंभुर्णी (माढा) (वि.के.) औद्योगिक क्षेत्र... टेंभुर्णी, कुर्डुवाडी, बार्शी आणि मंगळवेढा या औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्याची देखभाल व दुरूस्ती.. टेंभुर्णी, कुर्डुवाडी, बार्शी आणि मंगळवेढा या औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची, एक वर्षाकरिता साहित्य व मजुरीसह वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे व इतर अनुषंगीक कामे करणे. | २४,४६,०५६/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ३ | चिंचोली औद्योगिक क्षेत्र... चिंचोली औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्याची देखभाल व दुरूस्ती.. चिंचोली औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची, एक वर्ष कालावधीकरीता साहित्य व मजुरीसह वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे व इतर अनुषंगीक कामे करणे. | ४०,२४,५६०/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |
| ड) | **का.अ., मऔविम, विवयां. विभागांतर्गत अहिल्यानगर उपविभाग, अहिल्यानगर.** | | |
| १ | अहिल्यानगर औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठेची देखभाल व दुरूस्ती... जलशुध्दीकरण केंद्र, जल उदंचन केंद्र व बुस्टर पंपीग केंद्र येथील वार्षिक देखभाल व दुरूस्ती करीता सुविधा पुरविणे. | २७,५२,९००/- | दि.०६/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ |



# बिग बींनी दिला तणावमुक्तीचा मंत्र

**हिंदी** चित्रपटसृष्टीचे महानायक अमिताभ बच्चन आगामी 'कल्की २८९८ एडी' या सायन्स फिक्शन चित्रपटामध्ये अश्वत्थामाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटात त्यांच्यासोबत प्रभास, दीपिका पदुकोण आणि कमल हासन यांच्या प्रमुख भूमिका आहेत. याव्यतिरिक्त, ते 'कलम २८' आणि दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत यांच्यासोबत 'वेत्तैयान' या चित्रपटातही झळकणार आहेत. अलीकडेच त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या मनातील घालमेल आणि अस्वस्थतेवर प्रकाश टाकला आहे. वयाची ऐंशी पार केल्यानंतरही कामाप्रती असलेली त्यांची निष्ठा आणि सतर्कता कायम असून, अलीकडेच त्यांनी एका ब्लॉगमध्ये दैनंदिन जीवनातील अनिश्चिततेमुळे येणाऱ्या तणावावर भाष्य केले आहे. अमिताभ लिहितात की, कधीकधी दिवस आपण ठरवलेल्या नियोजनानुसार जात नाही आणि अशा वेळी मनात अस्वस्थता निर्माण होते. त्यांनी लिहिले, जेव्हा दिवस तुमच्या इच्छेनुसार घडत नाही, तेव्हा तुम्ही विचार करू लागता की, असे का होत आहे? अशा वेळी एक प्रकारची चिंता ग्रासून टाकते आणि मग मनात विचारांचे काहूर माजते. या अस्वस्थतेतून मार्ग काढण्यासाठी त्यांनी शांत राहण्याचा आणि संयम राखण्याचा सल्ला दिला आहे.



# शाहरुखचा दीपिकाला 'आधार'

**'किंग'** चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान शाहरुख खानने दाखवलेली सहृदयता आणि सौजन्य सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. केपटाऊनमध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू असतानाचा एक व्हिडिओ इंटरनेटवर वेगाने प्रसारित झाला असून, त्यामध्ये शाहरुख सहकलाकार दीपिका पदुकोणला मदत करताना दिसत आहे.

रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण यांनी अलीकडेच त्यांच्या दुसऱ्या बाळाच्या आगमनाची गोड बातमी चाहत्यांसोबत शेअर केली होती. गर्भधारणेच्या काळातही आपले काम आणि वैयक्तिक आयुष्य यांचा समतोल राखत दीपिका सध्या 'किंग' चित्रपटाच्या कामात व्यग्र आहे. आताच्या व्हिडिओमध्ये, पायऱ्या चढताना शाहरुखने थांबून मागे वळून दीपिकाला आपला हात दिला आणि तिला आधार देत वर नेले. शाहरुखच्या या कृतीचे चाहत्यांकडून भरभरून कौतुक केले जात आहे. अनेकांनी त्याला 'खरा गृहस्थ' (जंटलमन) असे संबोधले आहे, तर काहींनी या जोडीचे वर्णन 'किंग आणि क्वीन' असे केले आहे. सोशल मीडियावर या व्हिडिओवर प्रतिक्रिया देताना एका चाहत्याने म्हटले की, शाहरुख आणि दीपिकाला पुन्हा एकत्र पाहणे हा एक वेगळाच अनुभव आहे. सिद्धार्थ आनंद यांचे दिग्दर्शन आणि सह-लेखन असलेला 'किंग' हा चित्रपट २४ डिसेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटामध्ये शाहरुख खान आणि दीपिका पदुकोण यांच्यासोबत सुहाना खान, अभिषेक बच्चन, राघव जुयाल आणि राणी मुखर्जी यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच अशा प्रकारचे पडद्यामागचे क्षण चाहत्यांची उत्सुकता अधिकच वाढवत आहेत.

# 'पती पत्नी और वो २' वादावर आयुष्मानचे स्पष्टीकरण

**बॉलिवूड** अभिनेता आयुष्मान खुराना सध्या त्याच्या आगामी 'पती पत्नी और वो २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या कथानकावरून सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत असतानाच, आयुष्मानने या चित्रपटाची बाजू सावरून धरली आहे. एका मुलाखतीत त्याने या चित्रपटाचे समर्थन करताना स्पष्ट केले की, हा चित्रपट केवळ मनोरंजनासाठी असून, तो 'कॉमेडी ऑफ एरर्स' म्हणजेच गफलतींमधून निर्माण होणारा विनोद या प्रकारातील आहे.

चित्रपटाच्या शीर्षकावरून आणि विषयावरून काही प्रमाणात टीका होत असली, तरी आयुष्मानने प्रेक्षकांना खात्री दिली आहे की, यात कोणाच्याही भावना दुखावण्याचा हेतू नाही. त्याने नमूद केले की, चित्रपटसृष्टीत असे विषय हाताळताना विनोदाचा आधार घेतला जातो आणि हा चित्रपटही त्याच पठडीतील आहे. आयुष्मानच्या मते, चित्रपटामध्ये निर्माण होणारे गुंतागुंतीचे प्रसंग आणि त्यातून घडणारी विनोदी पात्रे प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करतील. 'पती पत्नी और वो' या मूळ चित्रपटाच्या यशानंतर या दुसऱ्या भागाकडून प्रेक्षकांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. आयुष्मान नेहमीच सामाजिक संदेश देणारे किंवा वेगळ्या धाटणीचे चित्रपट करण्यासाठी ओळखला जातो. त्यामुळे या विनोदी चित्रपटात तो नेमकी कोणती भूमिका साकारणार, याची उत्सुकता चाहत्यांमध्ये निर्माण झाली आहे. चित्रपट केवळ विरंगुळा म्हणून पाहिला जावा, असे आवाहनही त्याने यावेळी केले.



# प्रियांकाला 'ग्लोबल वॅन्गार्ड'



हॉलिवूड आणि बॉलिवूडमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी अभिनेत्री प्रियांका चोप्रा जोनास यंदाच्या ७८ व्या 'मेट गाला' सोहळ्याला अनुपस्थित राहिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. प्रियांकाच्या या निर्णयामुळे तिच्या चाहत्यांची काहीशी निराशा झाली होती. पण मेट गालाला मुकणारी प्रियांका ९ मे रोजी लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या 'गोल्ड गाला' सोहळ्याला उपस्थित राहणार आहे. विशेष म्हणजे, या सोहळ्यात प्रियांकाला 'ग्लोबल वॅन्गार्ड' या अत्यंत प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तिच्या २५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा आणि जागतिक स्तरावर तिने पाडलेल्या प्रभावाचा गौरव म्हणून हा पुरस्कार तिला प्रदान केला जाणार आहे. २०१७ मध्ये निक जोनाससोबत मेट गालामध्ये पदार्पण केल्यापासून प्रियांका या सोहळ्यातील एक नियमित चेहरा राहिली आहे. गेल्या काही वर्षांत तिने राल्फ लॉरेन, डियोर आणि व्हॅलेंटिनो यांसारख्या दिग्गज डिझाईनर्सचे पेहराव परिधान करून फॅशन विश्वात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. फॅशनच्या या सर्वात मोठ्या रात्री प्रियांकाची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवणार असली, तरी जागतिक स्तरावर मिळणारा तिचा हा नवा बहुमान भारतीय चाहत्यांसाठी अभिमानास्पद ठरणार आहे.

# हुमा कुरेशी आणि रचित सिंग विवाहबंधनात अडकणार?



बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशी सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. ताज्या बातम्यांनुसार, हुमा कुरेशी आणि तिचा कथित जोडीदार रचित सिंग यावर्षी ऑक्टोबरमध्ये लग्नगाठ बांधण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. गेल्या काही काळापासून या दोघांच्या नात्याबद्दल चित्रपट वर्तुळात जोरदार चर्चा सुरू होत्या. मात्र आता त्यांच्या लग्नाच्या तारखेबाबतच्या चर्चांनी वेग घेतला आहे.

रचित सिंग हा एक प्रसिद्ध मॉडेल आणि अभिनेता असून, हुमासोबतचे त्याचे अनेक फोटो सोशल मीडियावर अनेकदा व्हायरल झाले आहेत. या दोघांनीही अद्याप आपल्या नात्याबद्दल अधिकृतपणे कोणतीही कबुली दिलेली नसली, तरी विविध कार्यक्रमांमध्ये त्यांना एकत्र पाहिले गेले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, हा विवाह सोहळा अत्यंत खासगी स्वरूपाचा असू शकतो. ज्यामध्ये केवळ जवळचे मित्र आणि कुटुंबीय सहभागी होतील. हुमा कुरेशीने आपल्या अभिनयाने 'गँग्स ऑफ वासेपूर'पासून ते 'महाराणी'पर्यंत अनेक सशक्त भूमिका साकारल्या आहेत. तिच्या लग्नाच्या या वृत्तामुळे चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, सर्वांचे लक्ष आता हुमा किंवा रचित यांच्याकडून येणाऱ्या अधिकृत घोषणेकडे लागले आहे.

# भाजपाच्या रणनितीपुढे ममतांचा गड कोसळला



**पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसचा पराभव करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने सामदामदंडभेद अशी सर्व शक्ती पणाला लावली होती. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रातील पंचवीस मंत्री, योगी आदित्यनाथ यांच्यासह भाजपाचे १६ मुख्यमंत्री, पक्षाचे दोनशे खासदार व चारशेहून अधिक आमदार तसेच विविध राज्यांतील हजारो कार्यकर्त्यांची फौज गेले दोन महिने पश्चिम बंगालमधे तैनात करण्यात आली होती. सुरक्षा दलाचे साडेतीन लाख कर्मचारी निवडणुकीसाठी आणले गेले. मुख्य सचिव, पोलीस आयुक्तांपासून पोलीस उप अधिक्षकांपर्यंत किमान पाचशे वरिष्ठ नोकरशहांच्या निवडणूक आयोगाने बदल्या करून नवीन नेमणुका केल्या. तृणमूल काँग्रेसची निवडणूक रणनिती तयार करणाऱ्या आयपॅक या खासगी कंपनीवर ईडीने निवडणुकीच्या तोंडावर छापे घातले. निवडणुकीतील आक्रमक प्रचाराने राज्यातील हिंदू व्होट बँक आकर्षित करण्यात भाजपाला यश मिळाले. तृणमूल काँग्रेसची महिला आणि मुस्लीम व्होट बँक यंदाच्या निवडणुकीत विभाजित झाल्याचा भाजपाला मोठा फायदा झाला. ऐंशी-नव्वद आमदार निवडून आणताना तृणमूल काँग्रेसला घाम फुटला तर भाजपाने आश्चर्यकारक दोनशेकडे झेप घेतली. मोदी व शहा यांना सतत हिम्मतीने आव्हान देणाऱ्या ममता बॅनर्जींचा गड पंधरा वर्षांनी कोसळला. निकालानंतर भाजपाच्या कार्यकर्त्यांनी 'जय श्री राम' अशा घोषणा देऊन झालमुडी आणि मिष्टी वाटून जल्लोश केला.**

**वाट्टेल** ते करून ममता यांना सत्तेवरून हटवायचे आणि भाजपाचा मुख्यमंत्री पश्चिम बंगालमध्ये बसवायचा असा मोदी-शहांनी चंग बांधला होता. शहा तर सलग सोळा दिवस कोलकात्त्यात ठाण मांडून बसले होते. मोदी-शहांच्या प्रचार सभा व रोड शोंनी भाजपाला मोठी ऊर्जा दिली. शहा शेवटच्या प्रचारसभेत म्हणाले- दि. ४ मे रोजी मतमोजणी सुरू होईल. सकाळी आठ वाजता मतपेट्या उघडल्या जातील, नऊ वाजता पहिली फेरी मोजून होईल, दहा वाजता दुसरी फेरी संपेल. दुपारी एक वाजता, ममता बॅनर्जींना बाय बाय, टाटा गुड बाय!

मोदी शेवटच्या सभेत म्हणाले - निकालानंतर भाजपाच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथग्रहण सोहळ्याला मला यावेच लागेल.

विधानसभा निवडणुकीत भाजपाचे कमळ फुलणार, भाजपाचे सरकार स्थापन होणार याचा मोदी-शहांना यंदा जबर आत्मविश्वास होता. भाजपाला प्रचंड यश मिळेल असे भाकीत बहुतेक एक्झिट पोलने वर्तवले होतेच. त्यावेळी ती आकडेवारी एकतर्फी व भाजपाला अनुकूल असल्याची शंका व्यक्त झाली होती. सन २०२१ मधे भाजपाने या राज्यात आपले ७७ आमदार निवडून आणले होते, हीच ममता यांना इशारा घंटा होती. पश्चिम बंगालमधे ३० ते ३२ टक्के मुस्लीम लोकसंख्या आहे. मुस्लिमांनी नेहमीच भाजपाच्या विरोधात मतदान केले आहे. गेली पंधरा वर्षे ही व्होट बँक ममता यांच्या पाठीशी भक्कम राहिली. या निवडणुकीत भाजपाने बांगलादेशी घुसखोरांचा मुद्दा प्रभावीपणे मांडला, घुसखोरीला तृणमूल काँग्रेसच जबाबदार आहे, व बांगलादेशींना ममता यांचा पक्ष संरक्षण देतो, असा संसदेपासून ते पश्चिम बंगालमधील सभांपर्यंत भाजपाने मुद्दा सातत्याने मांडला. ममता यांचा पक्ष मुस्लिमांचे तुष्टीकरण करतो हा मुद्दा भाजपाने हिंदु मतदारांवर ठसवला. त्याचा परिणाम हिंदु मतदार भाजपाकडे आकर्षित झाला. 'जय श्री राम' ही घोषणा प्रचारात लोकप्रिय झाली. एसआयआरचे भाजपाने केलेले समर्थन पक्षाच्या पथ्यावर पडले.

राज्यावरील ३४ वर्षांची कम्युनिस्टांची सत्ता हटवून ममता मुख्यमंत्री झाल्या. २०११, २०१६ आणि २०२१ अशा तीनही निवडणुका त्यांनी जिंकल्या. त्यांनी कम्युनिस्ट आणि काँग्रेसला संपवले. आता भाजपाने तृणमूल काँग्रेसला सत्तेवरून हटवले. ममता यांना अँटीइनकमबन्सीचा निवडणुकीत फटका बसला. त्यांच्या सरकारवर भाजपाने केलेले भ्रष्टाचाराचे आरोप महागात पडले. तृणमूल काँग्रेसची दहशत व गुंडागर्दी याला लोक कंटाळले होते. पक्षाच्या केडरच्या नावाखाली राज्यात दहशत निर्माण करणारे क्लब्ज तयार झाले होते. सलग पंधरा वर्षांच्या सत्तेनंतर लोकांना परिवर्तन पाहिजे होते. ते घडविण्यात भाजपाला यश मिळाले.

पंतप्रधान मोदी व केंद्रीय गृहमंत्री शहा हे भाजपाचे मोठे शक्तिशाली नेतेच निवडणूक प्रचारात उतरले होते. त्याचा लाभ पक्षाला झाला. केंद्रात भाजपा सत्तेवर आल्यापासून बारा वर्षांत देशात अनेक राज्ये जिंकली. एकवीस राज्यांत एनडीएचे सरकार स्थापन झाले. केंद्रात मोदींच्या पंतप्रधानपदाची हॅट्ट्रिक झाली. पण पश्चिम बंगालमध्ये भाजपाला सरकार स्थापन करता येत नाही ही मोदी शहांना मोठी बोच होती. पश्चिम बंगालमध्ये भाजपाने मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर केला नव्हता. ममता यांना आव्हान देऊ शकेल, असा भाजपाकडे राज्यात नेता नव्हता. त्यामुळे या निवडणुकीत मोदी विरूद्ध ममता असे राजकीय संघर्षाचे चित्र निर्माण झाले. पंतप्रधान विरूद्ध मुख्यमंत्री असे या निवडणुकीला स्वरूप आले. मोदींच्या वलयापुढे बंगालची वाघिण अशी प्रतिमा असलेल्या ममता यांचा करिष्मा कमी पडला. त्याचा लाभ भाजपाला मिळाला.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

भाजपाच्या विरोधात तृणमूल काँग्रेस, काँग्रेस व डावे पक्ष स्वतंत्र लढले. त्यामुळे विरोधकांमध्येच मताचे विभाजन झाले. मुस्लीम प्रभाव क्षेत्रातही मतांचे विभाजन झाले. त्यामुळे तृणमूल काँग्रेसचे नुकसान झालेच, पण काँग्रेसलाही त्याचा लाभ झाला नाही. काँग्रेस-तृणमूल काँग्रेस स्वतंत्र लढले. त्याचा लाभ भाजपाला झाला. त्यातही राहुल गांधी यांनी राज्यात येऊन ममतांच्या कार्यपद्धतीवरच केलेल्या धारदार टीकेला सोशल मीडियातून भरपूर प्रसिध्दी मिळाली.

गेल्या सत्तर वर्षांत पश्चिम बंगालमधील जनतेने काँग्रेस, कम्युनिस्ट, तृणमूल काँग्रेस याची राजवट अनुभवली. आता भाजपाला संधी देऊया असाही मतप्रवाह दिसला. लाडकी बहीण योजनेखाली ममता यांनी दरमहा पंधराशे रुपये सुरू केले होते, पण भाजपाने तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन देऊन लाडक्या बहिणींना आकर्षित केले. सरकारी नोकरीत महिलांना ३३ टक्के आरक्षण देऊ, असेही भाजपाने म्हटले आहे. पीएम किसान योजनेतील रक्कम नऊ हजार रुपये करणार असल्याचे स्वत: पंतप्रधानांनीच सांगितले. तरुणांसाठी आर्थिक योजनांच्या घोषणा भाजपाने केल्या आहेत. आता ममतापर्व संपुष्टात आले. निवडणुकीत दिलेली भरमसाठ आश्वासने पूर्ण करणे हे भाजपापुढे आव्हान आहे.

सन २०११ मध्ये भाजपाला एकही आमदार निवडून आणता आला नव्हता. २०२१ मध्ये भाजपाचे ७७ आमदार निवडून आले. २०२६ मध्ये दोनशेकडे वाटचाल केली. गेल्यावेळेपेक्षा भाजपाला चार टक्के मतदान जास्त झाले, पण ११७ पेक्षा जास्त जागा निवडून आल्या. मासे-भात खाणाराच भाजपाचा बंगाली मुख्यमंत्री होईल, असे शहा यांनी प्रचार सभेत सातत्याने सांगितले. हिंदी पट्ट्यात 'जय श्री राम' घोषणा देणाऱ्या भाजपाने बंगाली भाषिक जनतेसमोर 'जय माँ काली' अशा घोषणा देऊन मतदारांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. माँ, माटी, मोदी अशी नवी घोषणा झळकू लागली आहे. ■■■

# काम सुरू असताना रस्त्यावर विहीर आढळली! पालिका कोंडीत

■ मुंबई

**सांताक्रूझ**-चेंबूर जोडरस्ता प्रकल्पाच्या अंतर्गत वाकोला भागात सुरू असलेल्या एका रस्त्याच्या सिमेंट काँक्रिटीकरण कामादरम्यान ६० वर्षे जुनी विहीर आढळली.परंतु आता ही विहीर बुजवणे नियमात बसत नसल्याने पालिकेची कोंडी झाली.

वाकोला येथील 'डीपी' रोडची सुधारणा करण्यासाठी रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण काम हाती घेण्यात आले. मात्र, या रस्त्याला लागूनच एक जुनी विहीर आढळली आहे.आता ही विहीर बुजवायची की, त्यावर लोखंडी मजबूत ग्रील बसवायची याबाबत पालिकेचा पर्यावरण, कीटकनाशक विभाग व रस्ते विभाग विचार करत आहे. प्रभाग क्र. ८८ मधील खांडवाला कंपाऊंड, वाकोला पाईपलाईन ते रुपवाल अपार्टमेंट या रस्त्यावर ही ६० वर्षे जुनी विहीर असून, या विहिरीला पाणी स्त्रोत नसल्यामुळे ती वापरात नाही. त्यामुळे स्थानिक तिचा वापर कचरा टाकण्यासाठी करत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरून आरोग्यास बाधा होण्याची शक्यता आहे.

# नाशिकच्या म्हाडा भूखंड घोटाळा प्रकरणी तहसीलदारास अटक

■ नाशिक

म्हाडा जमीन फसवणूक घोटाळ्यात बनावट नकाशांद्वारे ४९ पैकी ३१ प्रकरणांना मंजुरी दिल्याप्रकरणी नाशिकचा नायब तहसीलदार संशयित नितीन पाटील यांना गुन्हे शाखा युनिट एकने घरातूनच अटक केली. न्यायालयाने त्यांना ६ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.नाशिकमधील म्हाडाच्या जमिनींवरील आरक्षणात झालेल्या बनावटगिरीबाबत २ महिन्यांपासून नाशिक पोलीस आयुक्तालयाचे विशेष तपास पथक तपास करीत आहे. या पथकाने शनिवारी रात्री उशिराने नितीन पाटील यांना ताब्यात घेतले.




पश्चिम बंगाल, आसाम, आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांमध्ये घवघवीत यश मिळाल्यामुळे मुंबईतील भाजपा कार्यालयाबाहेर भाजपा कार्यकर्त्यांनी ढोल-ताशाच्या गजरात जल्लोष केला. (छाया : दीपक साळवी)

# कराडमधील आरफळ कालवा कोरडा मसूर भागातील पिके करपण्याच्या मार्गावर

■ कराड

**तालुक्यातील** आरफळ कालवा कोरडा पडल्याने मसूर भागातील शेतकऱ्यांच्या उसासह अनेक पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. नियोजित रोटेशन कोलमडल्याने शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

अनेक दिवसांपासून कालव्यात पाण्याचा थेंब नसल्याने कालवा पूर्णपणे कोरडा पडला आहे. त्यावर अवलंबून असलेल्या विहिरींचे जलस्तरही झपाट्याने घसरले आहेत. अनेक विहिरी कोरड्या पडल्याने गावागावांत पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. वरच्या टोकावर अनियमित व अनधिकृत पाणीउचल होत असल्याने शेवटच्या टोकावरील



शेतकरी पाण्यापासून वंचित राहत असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून होत आहे. उसासारख्या पाण्यावर अवलंबून असलेल्या पिकांना निर्णायक टप्प्यावर पाणी न मिळाल्यास संपूर्णपणे हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

# श्री सिद्धिविनायक मंदिर अंगारकी चतुर्थीसाठी सज्ज



**मुंबई -** उद्या मंगळवारी असलेल्या अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त प्रभादेवीच्या श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ट्रस्टने जय्यत तयारी केली आहे. मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन ट्रस्टने दर्शनासाठी ठराविक वेळापत्रक निश्चित केले असून, सुरळीत व्यवस्था राखण्यासाठी कडक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या आहेत. मंदिरातील धार्मिक कार्यक्रमांची सुरुवात पहाटे ३.१५ वाजल्यापासून वेळेत महापूजा आणि आरतीने होईल. त्यानंतर दुपारी १२.१५ वाजता नैवेद्य दाखवण्यात येईल. सायंकाळी ७ वाजता धूपआरती होईल. रात्री ८.५० पासून रात्री १०.१९ चंद्रदर्शन होईपर्यंत महापूजा आयोजित करण्यात आली आहे.

# केरळमध्ये काँग्रेस आघाडी विजयी डाव्यांची सत्ता देशातून हद्दपार

**तिरुअनंतपूरम -** केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसप्रणित युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (युडीएफ) ने स्पष्ट बहुमत मिळवत डाव्या पक्षांच्या आघाडीला (एलडीएफ) पराभूत केले. या निकालामुळे डाव्या पक्षांचा देशातील अखेरचा गडही कोसळला. तर सततच्या पराभवाच्या मालिकेत काँग्रेससाठी हा विजय दिलासा देणारा ठरला. एकही आमदार नसलेल्या भाजपाने पिनरन यांचे मंत्री मंत्री ओ. आर. केलू यांचा पराभव झाला. तर एलडीएफचे महत्त्वाचे नेते जोस के. मणी पाला मतदारसंघात पराभूत झाले. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री चंडी ओमन यांनी विजय मिळवला.

विजयाचा कल स्पष्ट होताच तिरुवनंतपूरम येथील काँग्रेस कार्यालयात कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केला. युडीएफला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रिपदासाठी



प्रथमच केरळात खाते उघडत २ जागांवर विजय मिळवला.

केरळमध्ये गेली १० वर्षे सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील एलडीएफ सरकारला पराभवाचा सामना करावा लागेल असे भाकीत सर्वच एक्झिट पोलनी केले होते. मात्र, काँग्रेसप्रणित युडीएफने १०० हून अधिक जागा जिंकत सगळ्यांना चकीत केले. एलडीएफला अँटी-इन्कम्बन्सीचा फटका बसल्याचे मानले जात आहे. तर डाव्यांच्या बाजूने असलेल्या अल्पसंख्याक मतांचे ध्रुवीकरण करण्यात काँग्रेसला यश मिळाले. पश्चिम बंगालनंतर त्रिपुरानंतर केवळ केरळमध्येच डाव्यांची सत्ता होती. मात्र या निकालामुळे देशातील एकाही राज्यात डाव्यांची सत्ता उरली नाही. ४९ वर्षांत पहिल्यांदाच देशात डावे सरकार नाही. स्वत: मुख्यमंत्री पिनराई विजयन आपल्या धर्मादाम मतदारसंघात बऱ्याच फेऱ्यांपर्यंत पिछाडीवर होते. शेवटच्या काही फेऱ्यांत त्यांनी आघाडी मिळवली.

### केरळ (१४०)

| | |
|---|---|
| डावी आघाडी | ३५ |
| काँग्रस आघाडी | १०२ |
| भाजपा | ३ |

काँग्रेसमध्ये चुरस वाढली आहे. मुख्यमंत्रिपदासाठी के. सी. वेणुगोपाल, व्ही. डी. सतीशन, रमेश चेन्निथला आणि चांडी ओमान यांची नावे चर्चेत आहेत. या निकालानंतर काँग्रेस खासदार शशी थरूर म्हणाले की, सत्ताधारी आघाडीतील काही मंत्री किंवा आमदार वैयक्तिक स्तरावर लोकप्रिय असले तरी, राज्यातील जनतेने एकूण कारभाराचा विचार करून मतदान केले. लोकांना विद्यमान परिस्थितीत बदल हवा होता आणि त्यांनी त्यासाठी निर्णायक मतदान केले. हा निकाल केवळ सत्तांतराचा संकेत नाही, तर मतदारांच्या परिपक्वतेचे द्योतक आहे.

# पुद्दुचेरीत पुन्हा एनडीए आघाडीचे सरकार

**पुद्दुचेरी -** पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी एनडीए आघाडीचे सरकार पुन्हा येणार आहे. या आघाडीत ऑल इंडिया एन.आर., काँग्रेस, भाजपा अण्णा द्रमूक आणि एल.जे.के. या पक्षांचा समावेश आहे. या आघाडीला ३० पैकी १७ जागा मिळाल्या आहेत. तर काँग्रेस, द्रमुक, व्हीसीके आघाडीला ८ जागा मिळाल्या आहेत. इतर पक्षांना ५ जागा मिळाल्या आहेत. गेल्या निवडणुकीतही एनडीए आघाडीने १६ जागा जिंकल्या होत्या.

### पुदुच्चेरी (३०)

| | |
|---|---|
| एनआरसी | १७ |
| काँग्रेस | ८ |
| टीव्हीके | २ |
| इतर | ३ |

# विजय यांची अनपेक्षित मुसंडी

पान १ वरून

सत्तासमीकरण तयार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विजय थलापती यांनी आपण भाजपासोबत जाणार नाही, असे आधीच स्पष्ट केले आहे. मात्र आता दोन्ही पक्ष एकत्र येऊ शकतात.

स्टॅलिन यांनी केंद्र सरकारविरोधात भूमिका घेऊन तमिळ अस्मितेच्या मुद्याला महत्त्व दिले होते. नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि हिंदी भाषा सक्तीच्या मुद्यावरून त्यांचे केंद्र सरकारशी खटके उडाले. केंद्र सरकारने तामिळनाडूचा निधीही अडवून ठेवला होता. परंतु आर्थिक कोंडी होऊनही स्टॅलिन यांनी आपली भूमिका बदलली नाही. मात्र तमिळ अस्मितेचा मुद्दा त्यांना मते मिळवण्यात झाला नाही. स्टॅलिन यांचे पुत्र उदयनिधी स्टॅलिन सनातन धर्माबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्यामुळे वादात सापडले होते. सनातन उन्मुलन संमेलनात बोलताना उदयनिधी यांनी सनातन धर्माला आजार पसरवणाऱ्या डासांची उपमा देत सनातन धर्माचा नायनाट करण्याची भाषा केली होती.

दुसऱ्या बाजूला अभिनेता विजयने कुठलीही हवा नसताना आश्चर्यकारक यश मिळवले. टीव्हीकेने शंभरी ओलांडताच विजय यांच्या चेन्नईतील निवासस्थानी कार्यकर्ते आणि कुटुंबियांनी मोठा जल्लोष सुरू केला. त्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यात ते पक्षाचे निवडणूक चिन्ह असलेली शिट्टी वाजवत आनंद साजरा करताना दिसत आहेत. विजय याची दोन वर्षांतील राजकीय वाटचाल थक्क करणारी आहे. २००९ मध्ये विजय यांनी विजय मक्कल अय्यकम नावाने स्वतःचा फॅन क्लब सुरू केला. २०११ च्या विधानसभा निवडणुकीत विजय यांनी अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीला पाठिंबा दिला होता. त्यानंतर २०२२ मध्ये त्यांच्या फॅन क्लबमधील सदस्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लढवल्या. त्यांनी तब्बल ११५ जागा जिंकल्या. २ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांनी तमिलगा वेट्री कझगम (टीव्हीके) या राजकीय पक्षाची स्थापना केली, तेव्हाच त्यांनी चित्रपट क्षेत्रातून निवृत्ती स्वीकारत पूर्ण वेळ राजकीय करिअर करण्याची घोषणा केली होती. त्यानंतरच्या तामिळनाडू विधानसभेच्या पहिल्याच निवडणुकीत त्याने सत्तेपर्यंत पोहोचण्याचा चमत्कार केला.

## विजय यांच्या ड्रायव्हरचा मुलगा आमदार झाला

तामिळी सुपरस्टार विजय यांच्या टीव्हीके पक्षाच्या झंझावातामध्ये विजय यांचे दीर्घ काळापासून विश्वासू ड्रायव्हर राजेंद्रन यांचे पुत्र सबरिनाथन हे विरुगंबक्कम मतदारसंघातून विजयी झाले आहे. सबरिनाथन यांना टीव्हीकेने उमेदवारी जाहीर केली होती तेव्हा सबरिनाथन यांना मंचावरच अश्रू अनावर झाले होते. तो व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. विजय यांनी एका सामान्य कर्मचाऱ्याच्या मुलाला पक्षातून उमेदवारी देऊन विश्वास आणि निष्ठेचा संदेश दिला होता.

# आसामात तिसऱ्यांदा भाजपा काँग्रेसची पुन्हा घसरण

### आसाम (१२६)

| | |
|---|---|
| भाजपा | १०२ |
| काँग्रेस | २१ |
| इतर | ३ |

**दिसपूर -** आसाममध्ये भाजपाने दोन तृतियांश जागा जिंकत सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवली. तर काँग्रेसची मागील निवडणुकीपेक्षाही घसरण झाली. काँग्रेसला गेल्या निवडणुकीत २९ जागा मिळाल्या होत्या. यावेळी त्यांना २१ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसचे नेते गौरव गोगोई यांचा जोरहाट मतदारसंघातून पराभव झाला. हा काँग्रेससाठी मोठा धक्का आहे. तर मुख्यमंत्री हिमंत सरमा यांनी आपली ताकद पुन्हा सिद्ध केली.

## गौरव गोगोई यांचा तब्बल २३ हजार मतांनी पराभव

आसाममध्ये काँग्रेसचा प्रमुख चेहरा मानले जाणारे गौरव गोगोई यांना जोरहाट मतदारसंघातून मोठा धक्का बसला आहे. त्यांचा तब्बल २३,१८२ मतांनी पराभव झाला. भाजपाचे उमेदवार हितेंद्र नाथ गोस्वामी यांनी त्यांचा पराभव करत काँग्रेसच्या बालेकिल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

या निवडणुकीत 'मामा' आणि 'मियां' या दोन शब्दांची खूप चर्चा झाली होती. 'मियां' म्हणजे मुसलमानांच्या मुद्यावर भाजपाने आक्रमक भूमिका घेतली होती. बांगलादेशी घुसखोरी, राष्ट्रीय नागरिक नोंदणी आणि नागरिकत्व सुधारणा कायदा यांसारख्या संवेदनशील विषयांवर भाजपाने हिंदू मतांचे ध्रुवीकरण साधले. तर सरमा यांनी 'मामा' अशी स्वत:ची प्रतिमा उभी करत आपल्याला राज्यातील महिलांचा संरक्षक म्हणून सादर केले.

या विजयाचे प्रमुख शिल्पकार मुख्यमंत्री हिमंत सरमा यांनी भावनिक आणि सामाजिक पातळीवर प्रभावी रणनीती राबवली. 'अरुणोदयी २.०'सारख्या योजनांद्वारे लाखो महिलांच्या बँक खात्यात थेट आर्थिक मदत म्हणून जमा करण्यात आली. याशिवाय भाजपाने एजीपी आणि यूपीपीएलसारख्या स्थानिक पक्षांसोबत युती केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही आसाममध्ये प्रचार केला. प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिब्रूगड येथील चहाच्या मळ्याला भेट देत महिला कामगारांशी संवाद साधला. त्याची मोठी चर्चा झाली. काँग्रेसकडून राहुल गांधी आणि राज्यातील प्रमुख चेहरा गौरव गोगोई यांनी आक्रमक प्रचार केला. मात्र त्याचा अपेक्षित परिणाम दिसला नाही. एआययूडीएफसोबत प्रभावी आघाडी न झाल्याने मुस्लीम मतांचे विभाजन झाले आणि त्याचा फायदा भाजपाला झाला.

# ममतांची १५ वर्षांची राजवट संपुष्टात

पान १ वरून

२०११ मध्ये डाव्यांना सत्तेतून बाहेर काढून ममता बॅनर्जी बंगालच्या मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांनी सलग तीन वेळा राज्याच्या निवडणुका जिंकल्या होत्या. यावेळी भाजपाने ममता यांना कुठल्याही परिस्थितीत सत्तेबाहेर काढण्याचा चंग बांधला होता. याची तयारी भाजपाने खूप आधीपासून केली. त्यांनी हळूहळू पश्चिम बंगालमध्ये ममतांच्या विरोधात वातावरण तयार केले. त्यानंतर पद्धतशीर प्रचार सुरू केला. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यापासून भाजपाची सत्ता असलेल्या राज्यांचे मुख्यमंत्रीही पश्चिम बंगालमध्ये जाऊन प्रचारसभा घेतल्या. एकट्या अमित शहा यांनी ३० जाहीर सभा घेतल्या. १२ रोड शो केले.

भाजपाने ममता यांच्या राजवटीतील भ्रष्टाचार, बेरोजगारी, गुन्हेगारी आणि तृणमूल कार्यकर्त्यांची कथित गुंडगिरी हे प्रचाराचे प्रमुख मुद्दे बनवले. ते जनतेपर्यंत जोरदारपणे पोहोचवले.

कोलकातामध्ये एका महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर भाजपाने ममता बॅनर्जी सरकारच्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्नचिन्ह उभे केले. अनेक दिवस हा मुद्दा लावून धरला. निवडणुकीत आर. जी. कार पीडितेच्या आईला उमेदवारीही दिली. या निवडणुकीत भाजपाने ममतांचा भ्रष्टाचार हाही एक प्रमुख मुद्दा होता. शिक्षक भरती घोटाळ्यावरून त्यांना घेरले. ममता बॅनर्जी यांची प्रतिमा जरी स्वच्छ असली, तरी त्यांच्या अनेक मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. तृणमूलची निवडणूक प्रचार संस्था असलेल्या आयपॅकवरही भ्रष्टाचाराचे आरोप झाले. बंगालमधील एसआयआर प्रक्रिया सर्वाधिक वादग्रस्त ठरली.

एसआयआरमधील कथित अनियमिततेविरोधात युक्तिवाद करण्यासाठी ममता बॅनर्जी सर्वोच्च न्यायालयातही गेल्या होत्या. राज्यात मतदानाच्या दोन दिवस आधीपर्यंत मतदारांची नावे जोडली आणि वगळली जात होती. एसआयआर दरम्यान, ९० लाखांहून अधिक लोकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली. राज्यातील अनेक विधानसभा मतदारसंघ होते, जिथे लाखो मतदारांची नावे वगळण्यात आली. याचा फटका ममता यांना बसला. यावेळी पश्चिम बंगालमध्ये एकूण सरासरी मतदान ९२.९३ टक्क्यांपेक्षा जास्त झाले. तो देशातील कोणत्याही राज्यातील मतदानाचा एक नवीन विक्रम ठरला. या मतदानानेही समीकरण बदलल्याचे बोलले जात आहे. भाजपाने पश्चिम बंगालसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात महिलांसाठी ३,००० रुपये मासिक भत्ता, बेरोजगार तरुणांसाठी ३,००० रुपये भत्ता देण्याची घोषणा केली. गर्भवती महिलांना २१,००० रुपये आणि सहा पोषण किट आणि राज्य परिवहन बसमधून सर्व महिलांना मोफत प्रवास देण्याचेही आश्वासन दिले. भारताच्या या रणनीतीने ममता यांचा पराभव निश्चित केला.

मतमोजणीचे चित्र स्पष्ट होऊनही ममता पराभव मान्य करायला तयार नव्हत्या. दुपारी त्या भवानीपूर मतमोजणी केंद्रात गेल्या होत्या. साडेचार तासानंतर तिथून बाहेर पडल्यावर त्यांनी बरीचे आगपाखड केली. त्यांनी आरोप केला की, भाजपाने आमच्या १०० जागा चोरल्या. निवडणूक आयोग भाजपाचा एजंट असल्यासारखा काम करत आहे. मतदान केंद्रांत मला मारहाण झाली. माझे केस खेचले, मला लाथ मारली. सीसीटीव्ही बंद करण्यात आले होते. आमच्या एजंटलाही घुसून दिले नाही.

तर भाजपाचे सुवेंदू अधिकारी म्हणाले की, ममतांना बंगालच्या हिंदू जनतेने नाकारलेले आहे. धडा शिकवला आहे. आता त्यांना त्यांचे रडगाणे रडू द्या.

## पश्चिम बंगालमध्ये नवीन सूर्योदय झाला आहे

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे अध्यक्ष नितीन नवीन यांनी संध्याकाळी नवी दिल्लीतील भाजपा मुख्यालयात कार्यकर्त्यांनी विजयोत्सव साजरा केला. त्यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना नरेंद्र मोदी म्हणाले की, आजचा दिवस ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आहे. भाजपा कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. या कार्यकर्त्यांनी



आज नवीन इतिहास रचला. नितिन नवीन भाजपा अध्यक्ष झाल्यानंतर पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाने आता घवघवीत यश मिळवले आहे. ५ राज्यांतील लोकांनी लोकशाही काय आहे हे जगाला दाखवून दिले आहे. भाजपावर लोकांचा विश्वास आणखी वाढत चालला आहे. हा विजय पश्चिम बंगालच्या लोकांना समर्पित करत आहे. पश्चिम बंगालमध्ये नवीन सूर्योदय झाला आहे. बंगालच्या विकासासाठी भाजपा दिवसरात्र एक करणार आहे. महिलांच्या सुरक्षेची आणि तरुणांना रोजगार देण्याचीदेखील हमी देणार आहे. राजकीय हिंसेमुळे पश्चिम बंगालमधील लोकांचे मोठे नुकसान झाले. येथे आता बदला नाही, बदलाव होणार आहे. लोकांच्या अपेक्षा आम्ही पूर्ण करणार आहोत.

## बाबरी मशीदवाले हुमायून दोन ठिकाणी विजयी

पश्चिम बंगालमध्ये अयोध्येसारखी बाबरी मशीद बांधायला निघालेले आणि त्यामुळे देशभरात चर्चेत आलेले हुमायून कबीर यांनी ते लढवत असलेल्या दोन मतदारसंघांमध्ये बाजी मारली आहे. नौदा मतदारसंघात ते सुमारे २५ हजार मतांच्या फरकाने तर रेजिनगर मतदारसंघात ५० हजारहून अधिकच्या फरकाने विजयी झाले. बाबरी मशीद बांधण्याच्या त्यांच्या संकल्पामुळे त्यांची तृणमूल काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर हुमायून कबीर यांनी आम जनता उन्नयन पार्टी हा आपला स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन केला. या पक्षातून त्यांनी दोन मतदारसंघांमधून निवडणूक लढवली.

# 'जेएएल' विक्री प्रकरणी अदानींना दिलासा! वेदांताचा दावा फेटाळला

■ नवी दिल्ली

**राष्ट्रीय** कंपनी कायदा अपील न्यायाधिकरणाने (एनसीएलएटी) जेएएल (जयप्रकाश असोसिएट्स लिमिटेड) या दिवाळखोर कंपनीच्या विक्रीप्रकरणी वेदांता कंपनीने दाखल केलेली याचिका फेटाळली. तर अदानी एंटरप्रायझेसच्या निराकरण (रिझोल्यूशन) योजनेला कर्जदारांनी दिलेली मंजुरी योग्य ठरवली.

जेएएलसाठी अदानी समूहाने सुमारे १५ हजार कोटींची योजना दिली होती, तर वेदांताने १७ हजार कोटींची ऑफर दिल्याचा दावा केला. मात्र




सीओसीने केवळ रक्कम नव्हे, तर आगाऊ पेमेंट, निश्चितता आणि अंमलबजावणीचा कालावधी या निकषांवर अदानींची योजना निवडली. वेदांताने प्रक्रिया अपारदर्शक असल्याचा आरोप करत आपली ऑफर अधिक चांगली असल्याचा दावा केला होता. दिल्ली खंडपीठाने एनसीएलएटीमध्ये स्पष्ट केले की, कर्जदार समितीचा (सीओसी) निर्णय हा त्यांच्या व्यावसायिक नियमांवर आधारित असून, त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही. न्या. अशोक भूषण यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने निविदा प्रक्रियेनंतर वेदांताने दिलेल्या सुधारित प्रस्तावाचा विचार न करणे कायदेशीरदृष्ट्या योग्य ठरवत दोन्ही याचिका फेटाळल्या.

# क्रिकेट खेळताना घराचा स्लॅब कोसळून १० वर्षीय मुलाचा मृत्यू

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील यावल शहरात घरासमोरील ओट्यावर क्रिकेट खेळत असताना अचानक स्लॅब कोसळून १० वर्षीय रणवीर गायकवाड या मुलाचा मृत्यू झाला.

रणवीर नेहमीप्रमाणे मित्रांसोबत घराबाहेर क्रिकेट खेळत होता. अचानक घरासमोरील जीर्ण झालेल्या पोर्चचा स्लॅब कोसळून रणवीर त्याखाली दबला गेला. घटनेनंतर स्थानिकांनी त्यांना बाहेर काढले. गंभीर अवस्थेत त्याला भुसावळ येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी केलेले प्रयत्न अपयशी ठरले आणि त्याचा मृत्यू झाला.

या घटनेने गायकवाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. चार वर्षांपूर्वी रणवीरच्या वडिलांचे निधन झाले होते. त्यानंतर त्याची आई मोठ्या धैर्याने मुलांचा सांभाळ करत होती. मोठी मुलगी आणि रणवीर हेच तिचे विश्व होते.

# मुंबईत पुन्हा हिट-अँड-रन पवईत ३ पादचारी जखमी

■ मुंबई

**मुंबईतील** पवई परिसरात पुन्हा हिट-अँड-रनची धक्कादायक घटना घडली. जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोडवर कारने पादचाऱ्यांना चिरडल्याने तीन जण जखमी झाले. त्यापैकी एका महिलेची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. तिच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे. या घटनेचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.

रात्री उशिरा आयआयटी मार्केटजवळून जाणारी पांढऱ्या रंगाची क्रेटा कार रस्त्याच्या कडेने चालणाऱ्या पादचाऱ्यांमध्ये घुसली. धडक इतकी जबरदस्त होती की, तिघेही पादचारी हवेत उडून काही अंतरावर फेकले गेले. अपघातानंतर १९ वर्षीय चालक घटनास्थळावरून फरार झाला होता. मात्र मुंबई पोलिसांनी तपास सुरू करत काही तासांतच आरोपीला ताब्यात घेतले. एमआयडीसी झोन १० चे पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे



यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विरुद्ध हिट-अँड-रन आणि निष्काळजीपणे वाहन चालवण्याचा गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी सांगितले की, अपघाताच्या वेळी गाडीत आणखी दोन जण होते. अचानक एक महिला गाडीसमोर आल्याने चालकाने गाडी वळवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचवेळी रस्ता ओलांडणाऱ्या इतर पादचाऱ्यांना धडक बसली.

# जामिनासाठी साफसफाईची अट सुप्रीम कोर्टाकडून स्वत:हून दखल

**ओडिशामधील कनिष्ठ न्यायालय आणि ओडिशा उच्च न्यायालयाने एका खटल्यात आरोपीला पोलीस ठाण्यात साफसफाई करण्याच्या अटीवर जामीन देण्याच्या निर्णयाची सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून दखल घेत याचिका दाखल करून घेतली आहे. या निर्णयाची सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमल्ल्या बागची यांचे खंडपीठ समीक्षा करणार आहे.**

■ भुवनेश्वर

**न्यायालयांच्या** या विचित्र अटीवर गेल्या आठवड्यात बातमी प्रसिध्द झाली होती. या बातमीची गांभीर्याने दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने सू मोटो याचिका दाखल केली आहे.

राज्यात बेसुमार खाणकामांच्या विरोधात दलित आणि आदिवासी आंदोलन करत आहेत. या आंदोलकांपैकी अटक करण्यात आलेल्या एका आरोपीला जामीन मंजूर करताना कनिष्ठ न्यायालयाने दोन महिने दररोज सकाळी ६ ते ९ या कालावधीत काशिपूर पोलीस ठाण्यात साफसफाई करण्याची अट घातली होती. अशा प्रकारची आठ अन्य उदाहरणे मे २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत रायगड जिल्ह्यात घडली आहेत.

# कांजूरमार्गमध्ये १७५ कोटी खर्चून भव्य कला आणि सांस्कृतिक केंद्र

■ मुंबई

**चेंबूरची** फाईन आर्ट सोसायटी आणि सायनच्या षण्मुखानंद हॉलच्या धर्तीवर मुंबईच्या पूर्व उपनगरांतील कांजूरमार्ग येथे भव्य कला आणि सांस्कृतिक केंद्र उभारण्यात येणार आहे. कांजूरमार्ग पश्चिमेकडील एल. बी. एस. रोडलगत ३ एकर जागेत उभारण्यात येणार असलेल्या या कला केंद्रासाठी १७५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. एकावेळी २ हजार लोकांना सामावून घेण्याची क्षमता या केंद्राची असेल. महिंद्रा उद्योग समूहातील अन्थुरियम डेव्हलपर्स लिमिटेड या कंपनीने यासंबंधीचा प्रस्ताव पालिका आयुक्तांना दिला आहे. आयुक्तांची परवानगी मिळाल्यानंतर महिंद्रा लाईफ स्पेसिसतर्फे केंद्र उभारणीचे काम हाती घेण्यात येईल. संबंधित भूखंडाचा ताबा नुकताच मुंबई महानगरपालिकेला मिळाला आहे. ही जागा सांस्कृतिक केंद्र किंवा नाट्यगृह उभारण्यासाठी राखीव ठेवण्यात आली होती. त्यामुळेच महिंद्रा समूहाने पालिकेला हा प्रस्ताव दिला आहे.

# अनुराधा पतसंस्थेत ६.२७ कोटींचा अपहार! अध्यक्षाचा तुरुंगात मृत्यू

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ हिंगोली

**हिंगोली** येथील अनुराधा पतसंस्थेच्या ६.२७ कोटी रुपयांच्या अपहार प्रकरणात गेल्या २० महिन्यांपासून परभणीच्या तुरुंगात न्यायालयीन कोठडीत असलेल्या पतसंस्थेच्या अध्यक्षाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली येथील अनुराधा पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक कांबळे याने पतसंस्था स्थापन करून ठेवीदारांना जादा व्याजदराने परताव्याचे अमिष दाखविले होते. यामध्ये १० ते १२ टक्के व्याज देण्याचे अमिष दाखवून ४,०३८ ठेवीदारांकडून ६.२७ कोटी रुपयांच्या ठेवी गोळा केल्या होत्या. मात्र ठेवीदारांनी ठेवी दिल्यानंतर त्याची मुदत संपल्यानंतरही ठेवींची रक्कम परत केली नाही. त्यानंतर पतसंस्थेच्या लेखा परिक्षणामध्ये अध्यक्ष अशोक कांबळे व संचालकांनी बनावट ठराव व बनावट कर्जप्रकरण मंजूर करून सदर रकमेचा अपहार केल्याचे स्पष्ट झाले होते. २४ डिसेंबर २०१९ ते २४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत हा अपहार झाला.